बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | शनिवार,दि.२८सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक५७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## मुंबई उच्च न्यायालयात धाव

मुंबई: बदलापूर अत्याचार प्रकरणातील मृत आरोपी अक्षय शिंदे याच्या दफनविधीसाठी बदलापूरनंतर अंबरनाथ शहरातूनही विरोध झाला. गुरुवारी अक्षयचे पालक अंबरनाथमधील हिंदू स्मशानभूमी येथे दफन विधीची जागा पाहण्यासाठी आले होते. त्यानंतर दफनविधीच्या परवानगीसाठी अंबरनाथ पालिकेत गेले असता त्यांचा अर्ज स्वीकारला गेला नाही. तर अंबरनाथ मनसेच्या वतीने शहरात दफनविधी करण्याला विरोध केला गेला. यानंतर अक्षय शिंदेच्या पालकांचे वकील अमित कटारनवरे यांनी पुन्हा एकदा मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर न्यायालयाने सोमवारपर्यंत अंत्यविधी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच न्यायालयाच्या सूचना योग्यच असून अंत्यविधी झालाच पाहीजे, अशी भूमिका गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही व्यक्त केली आहे




# बीड पोलिसांच्या विरोधात देशभरात संतापाची लाट !

## घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेला झेंडा पोलिसांनी फेकून दिला!

### बीड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पोलिसांकडून आंबेडकरी अनुयायांवर लाठी हल्ला

### अनेक चौक आणि उड्डाण पूलांना मनमानी नावे दिली गेली तिथे वाद झाला नाही मग इथेच का?

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे छायाचित्र असलेला झेंडा फेकून देणाऱ्या पोलिसांवर कारवाईची मागणी!










बीड/ पुण्यभूमी

घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव बीड रेल्वे स्थानकास देण्यात यावे, या मागणीकरिता आंबेडकर अनुयायांकडून रेल्वे स्थानकावर फलक लावण्यात आला होता. दरम्यान रात्री सात ते आठ वाजण्याच्या सुमारास बीड ग्रामिण पोलीस ठाण्यातील ७० ते ८० पोलिसांनी रेल्वे स्थानकावर जावून झेंडा फेकून देत, फलक फाडण्यात आला. याचा जाब विचारणाऱ्या आंबेडकरी अनुयायवर पोलिसांनी लाठी हल्ला सुरु केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेला झेंडा आणि नामफलक फाडून फेकून देणाऱ्या बीड ग्रामीण पोलीस ठाण्यातील मग्रुर पोलीस अधिकारी,कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी,यासाठी आंबेडकरी अनुयायांनी थेट पोलीस अधीक्षक कार्यालयात धाव घेतली. बीड पोलिसांनी कोणत्या नेत्याच्या सांगण्यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेला झेंडा फेकून देत हा नामफलक फाडून अवमान केला आहे. त्याचा तपास करावा. ज्या व्यक्तीने तक्रार दिली आहे. त्याचे सीसीटीव्ही फुटेज तो नगरहून फिर्याद देण्यासाठी कधी बीडमध्ये आला. याचा जाब आंबेडकरी अनुरायांनी पोलिसांना विचारला. दरम्यान एवढे सेन्सिटिव्ह प्रकरण घडलेले असताना देखील पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांना आंबेडकरी अनुयायांना भेटावे असे वाटले नाही. त्यामुळे संशय निर्माण होतो आहे. अशा प्रतिक्रिया आंबेडकरी अनुयायांनी दिल्या.

पुण्यभूमी ग्राऊंड रिपोर्ट

## वाद चिघळण्याला पोलीसच जबाबदार!

आरक्षणाच्या मागणीवरून अगोदरच समाजा –समाजामध्ये तेढ निर्माण होत असल्याची राज्यात परिस्थिती असतानाच बीड शहरामध्ये रेल्वे स्थानकाला घटनेची शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा लावलेला फलक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेला झेंडा बीड ग्रामीण पोलिसांनी ज्या पद्धतीने काढला त्यामुळे आता हा नवा वाद निर्माण झाला. अशा प्रतिक्रिया व्यक्त होत असून या वादाला बीड ग्रामीण पोलीसच जबाबदार आहेत, असे मानले जात आहे. बीड ग्रामीण पोलिसांनी सन्मानाने तो झेंडा आणि नामफलक काढून ठेवले असते तर विटंबना झाली नसती. तसेच ज्या पद्धतीने बीड ग्रामीण पोलिसांनी झेंड्याची विटंबना केली हे कोणाच्या सांगण्यावरून झाले याची चौकशी होणे देखील क्रमप्राप्त आहे ठरते. असे आंबेडकरी अनुयायांचे म्हणणे आहे?

## पोलीस अन् रेल्वेचे इंजिनिअर कोणाच्या ओंजळीने पाणी पितात : ॲड. अविनाश गंडले



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महापुरुष आहेत. त्यांच्यामुळे देशाला आदर्श संविधान मिळाले. अशा महापुरुषांच्या नावाची रेल्वेला ऍलर्जी का? असा प्रश्न उपस्थित करत अड. अविनाश घडले यांनी याप्रकरणी पोलीस आणि रेल्वेचे इंजिनियर यांना इतकी घाई का? पोलिस आणि रेल्वे इंजिनियर यांच्यावर कोणी दबाव आणला होता का? असा संशय येत असून बीड ग्रामीण पोलीस आणि रेल्वेचे इंजिनिअर हे कोणाच्या उजळणीने पाणी पितात याचीही चौकशी करावी. अशी मागणी ॲड. अविनाश गंडले यांनी केली.

## झेंड्याची विटंबना; जाहीर निषेध:प्रेम कांबळे



बीड ग्रामीण पोलिसांनी रात्रीच्या वेळी मोठा फौज फाटा घेऊन येत. त्या ठिकाणी लावण्यात आलेला निळा झेंडा त्यावरती महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेला झेंडा आणि नाम फलक असलेले बॅनर ओढून काढले व झेंडा वरतून खाली फेकला. त्यावेळी या संदर्भात बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी बंटीवार यांना विचारणा केली असता आम्हाला अरेरावीची भाषा करून कॉलर पकडून धक्काबुक्की करीत त्या ठिकाणाहून हाकलून देत मारहाण केली. बंटीवार म्हणत होते की माझे काय करायचे ते करा? एकूणच या घटनेचा एक आंबेडकरी अनुयायी म्हणून मी जाहीर निषेध करीत आहे. अशी प्रतिक्रिया लाटी हल्ला झालेले प्रेम कांबळे यांनी दिली.

## अन्यथा आत्मदाह करुत:धम्मानंद वाघमारे



बीड शहरात नव्याने होत असलेले रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन असे नाव भीम अनुयायी यांनी दिले.परंतु बीड ग्रामीण पोलीस प्रशासनाने भीम अनुयायी यांना कसल्याही प्रकारची समज न देता डॉ. बाबासाहेब आंबेडकर बीड रेल्वे स्टेशन स्थानकाचे नामपलक रात्रीच्या काळोख्याचा फायदा घेत फाडले आहे. तसेच निळ्या ध्वजाचा खाली फेकून अपमान केला आहे.दंगल घडवण्याचा प्रकार बीड ग्रामीण पोलीस अधिकारी यांनी केला आहे. तरी संबंधित बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे तसेच पोलीस प्रशासनाने त्यांच्या खजिन्यातून २४ तासाच्या आत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन बीड असे नाम फलक पूर्वरत लावावेत अन्यथा २४ तासानंतर भीम दल संघटनेचे प्रमुख धम्मानंद वाघमारे जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदाह आंदोलन करण्याची भूमिका घेणार आहेत असे त्यांनी म्हटले.

## तो जातीवादी चेहरा कोणाचा:प्रशांत वासनिक



बीड शहरातच नव्हे तर जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी उड्डाणपूल आणि चौकांना महापुरुष, संत, महात्म्यांची नावे दिली गेली आहेत. त्या नावाला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाह. त्याचे आंबेडकरी समूहाने स्वागतच केले आहे. मात्र बीड रेल्वे स्थानकाला घटनेची शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे. अशा मागणीचे रीतसर निवेदन देऊन बीड रेल्वे स्थानकावर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचे नामफलक लावले असता बीड ग्रामीण पोलिसांनी हस्तक्षेप करून ज्या झेंड्यावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे छायाचित्र होते तो झेंडा काढून फेकून देण्यात आला. हा द्वेष पोलिसांनी का करावा? झेंडा काढायचाच होता तर तो सन्मानाने काढून व्यवस्थित ठेवणे गरजेचे होते. मात्र पोलिसांना अशा प्रकारचे दुष्कृत्य करायला कोणी भाग पाडले? तो जातीवादी चेहरा कोणाचा? असा सवाल प्रशांत वासनिक यांनी उपस्थित केला. दरम्यान हा जातीवादी चेहरा कोणाचा आहे? लवकरच निष्पन्न होईल. परंतु हा वाद केवळ बीड ग्रामीण पोलिसांमुळे चिघळला अशी प्रतिक्रिया प्रशांत वासनिक यांनी व्यक्त केली.


## रेल्वे स्थानकाला महापुरुषाचेच नाव लागणार

कोणतेही रेल्वे स्थानक हे सार्वजनिक मालमत्ता असते. त्यावर कोणाचीही वैयक्तिक मालकी नसते. त्यामुळे अशा सार्वजनिक ठिकाणाला महापुरुषांचीच नावे द्यावी लागतात. त्या ठिकाणी वैयक्तिक नावे देणे म्हणजे त्या सार्वजनिक ठिकाणचा अमान करण्यासारखे आहे. ज्या–ज्या महापुरुषांनी देश आणि मानवतेच्या विकासासाठी मूलभूत कार्य केले आहे. त्यांचेच नाव अशा ठिकाणाला द्यायला हवे. यामुळे बीड येथे होत असलेल्या रेल्वे स्टेशनला महापुरुषाचेच नाव लागणार यास कोणी अक्षय घेण्याची गरज नाही. अशा संतप्त प्रतिक्रिया आंबेडकरी समुदायाने व्यक्त केल्या.

## दंगल घडल्यास पोलीस अधीक्षकच जबाबदार?

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने या देशातल्या प्रत्येक माणसाच्या जीवनाच सोनं झालं. त्यांच्या उपकारामुळे सगळ्यांचे राहणीमान आणि जीवनमान उंचावले गेले. त्या महामानवाच्या नावाला हा विरोध म्हणजे बेईमानी आहे. बीडमध्ये सामाजिक सलोखा ढासळला तर त्याला पूर्णतः बीड पोलीस अधीक्षक जबाबदार असतील. यावेळी आंदोलनकर्ते असेही म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आम्ही बीड रेल्वे स्टेशनला दिले आहे. त्याची रीतसर नोंद घ्यावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना आम्ही दिलं होतं. मात्र त्यानंतर कोणाच्या इशाऱ्यावर पोलीस अधीक्षकांनी बीड ग्रामीण पोलिसांना आदेश देऊन हा प्रकार घडवून आणला आहे. याची चौकशी होण्यासाठी पोलीस अधीक्षक यांचीदेखील आयजी, पोलीस महासंचालक आणि आंबेडकर चळवळीतील खासदार यांच्याकडे आम्ही तक्रार करणार आहोत. उद्या काही अनुचित प्रकार घडला तर पोलीस अधीक्षक यांना जबाबदार धरण्यात यावं अशा प्रतिक्रिया आंबेडकरी अनुयातून उमटल्या आहेत.

## राखीव मतदार संघातील आमदार कुठं गेले?



आंबेडकरी अनुयायांनी बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिले होते. त्यानंतर बीड ग्रामीण पोलिसांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेला झेंडा आणि नामफलक फाडून टाकत अवमान केला. या घटनेचे पडसाद देशभर उमटले आहेत. असे असताना केज मतदार संघाच्या आ. नमिता गप्प का?त्यांना बाबासाहेबांच देणंघेणं नाही का? त्यामुळे केज मतदार संघातील दलितांनो परके कोण आपले कोण ओळखून ज्याला–त्याला त्याची जागा दाखवून द्या, मुंदडा कुटुंबातला एकही व्यक्ती सात पिढ्या निवडून येणार नाही याची दक्षता घ्या, अशा संतप्त प्रतिक्रिया देत, आंदोलनर्ते आंबेडकरी अनुयायांनी केज मतदार संघाच्या आ. नमिता यांच्यावर रोष व्यक्त केला.

खळबळ | बीड जिल्ह्यातही जातपंचायतचे साम्राज्य

# सासऱ्याच्या प्रेमविवाहाची सुनेला शिक्षा

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

सासऱ्याने समाजाची परवानगी न घेता प्रेमविवाह केला. त्यामुळे त्यांना तेव्हा अडीच लाख रुपयांचा दंड ठोठावला. त्यांनी तो न भरल्याने सुनेसह मुलाला जात पंचायतमध्ये बोलावले. त्यांनीही असमर्थता दर्शविल्याने पंचांनी या कुटुंबाला सात पिढ्या समाजातून बहिष्कृत करण्याचा आदेश दिला. तसेच पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यास जीवे मारू, अशा धमक्याही दिल्या. हा प्रकार २२ सप्टेंबर २०२४ रोजी आष्टी तालुक्यातील डोईठाण येथे घडला. हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला होता. अखेर नऊ जणांविरोधात आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यानिमित्ताने पुन्हा एकदा जात पंचायतचा मुद्दा समोर आला आहे.

मालन शिवाजी फुलमाळी (वय ३२, रा. कडा कारखाना, ता. आष्टी) यांचे सासरे नरसू फुलमाळी यांनी समाजाची परवानगी न घेता प्रेम विवाह केला होता. त्यांची जात



नंदीवाले (तीरमाली) अशी आहे.तेव्हा जात पंचायत बसविण्यात आली. यामध्ये नरसू फुलमाळी यांना

पान २ वर...

### आरोपींमध्ये यांचा समावेश

गंगाधर बाबू पालवे (रा. धनगरवाडी, ता. नेवासा, जि. अहमदनगर), उत्तम हनुमंत फुलमाळी (रा. जेवून आयबत्ती, ता. नेवासा, जि. अहमदनगर), गंगा गंगाराम फुसमाळी (रा. पाटसरा, ता. आष्टी), चिन्नू साहेबराव फुल माळी (रा. डोईठाण, ता. आष्टी), सुभाष फुलमाळी (रा. शनी शिंगणापूर, जि. अहमदनगर), बाबुराव साहेबराव फुलमाळी (रा. निमगाव गांगरडा, ता. कर्जत, जि. अहमदनगर), शेटीबा रामा काकडे (रा. वाळकी, जि. अहमदनगर), सयाजी सायबा फुलमाळी (रा. पिंपळनेर, जि. बीड), गुलाब पालवे (रा. धनगडवाडी, जि. अहमदनगर) यांच्यासह इतर पंचांचा आरोपींत समावेश आहे.

# विस्कळीत वास्तव!

भारत आणि चीन यांच्यातील सीमावादाबाबत आणि त्यातही पूर्व लडाखमधून जाणाऱ्या सीमेसंदर्भात उभय देशांत 'लक्षणीय प्रगती' झाली ही तशी चांगलीच घटना. तिचे स्वागत. काही दिवसांपूर्वी आपले परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी उभय देशांतील संबंधांत '७५ टक्के' सुधारणा झाल्याचे विधान केले होते. या ७५ टक्क्यांत मार्गी लागलेल्या वा मिटलेल्या समस्या कोणत्या आणि त्याहीपेक्षा उर्वरित २५ टक्क्यांत कशा-कशाचा समावेश आहे याबाबत स्पष्टता नसली तरी आपले परराष्ट्रमंत्रीच ७५ टक्क्यांचा वायदा देत असतील तर त्याबाबतही समाधान बाळगायला हवे. कारण उभय देशांतील तणावात गेल्या चार वर्षांत चांगलीच वाढ झालेली आहे आणि त्यास प्राय: चीन जबाबदार आहे. करोनाकाळात जग स्तब्ध असताना चीनने आगळीक केली आणि हे संबंध पुन्हा बिघडले. सध्या पूर्व लडाख परिसरात 'प्रत्यक्ष नियंत्रण रेषा' (लाइन ऑफ अॅक्चुअल कंट्रोल) परिसरात उभय देशांतील तणाव कमी व्हावा यासाठी चर्चा सुरू आहे. या चर्चेत चांगली प्रगती होत असल्याचे वृत्त आहे. कोणत्याही घटकांतील संघर्ष कमी होणे, उभयतांत विश्वास निर्माण होणे हे नेहमीच स्वागतार्ह असते. येथे तर ते अधिक. कारण नाही म्हटले तरी हा दोन प्रत्येकी शंभर-सव्वाशे कोटी नागरिकांना सामावून घेणाऱ्या आणि मुख्य म्हणजे एकमेकांना खेटून असलेल्या अगडबंब देशांतील संबंधांचा प्रश्न आहे. तो संवादाच्या मार्गाने, कोणत्याही लष्करी संघर्षाविना सुटू शकत असेल तर ती बाब निश्चितच स्वागतार्ह ठरते. तेव्हा परराष्ट्रमंत्री जयशंकर यांचा '७५ टक्क्यांचा' वायदा असो वा लष्करी/नागरी अधिकाऱ्यांतील चर्चेच्या पुढील फेऱ्या असोत; या दोन्हीही घटना दखलपात्र ठरतात. ते स्वागत करताना काही शंका उपस्थित होतात. त्यांचे निराकरण झाल्यास अधिक बरे.जसे की उभय देशांत मतभेदांचे नक्की कोणते मुद्दे शिल्लक आहेत आणि कोणत्या मुद्द्यांवर एकमत झालेले आहे, याचा तपशील. उभय देशांत चर्चेच्या जवळपास दोन डझन फेऱ्या आतापर्यंत पार पडल्या. इतक्या प्रदीर्घ चर्चेत काही मुद्दे तरी निश्चितच सुटले असणार. तेव्हा न सुटलेल्या मुद्द्यांचे एक वेळ राहू दिले जावे, असे सरकारला वाटत असले तरी निदान सुटलेल्या प्रश्नांची माहिती देण्यास प्रत्यवाय नसावा. ही माहिती उपयुक्त ठरेल. त्याच वेळी सध्या संयुक्त राष्ट्र आमसभेच्या निमित्ताने न्यूयॉर्क येथे असलेले परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी एक वेगळेच विधान केले. ''उभय देशांतील संघर्ष, हा भारत-चीन देशांतील समस्येचा फक्त एक भाग झाला. पण कळीचा मुद्दा आहे तो गस्त घालण्याचा अधिकार'' असे जयशंकर म्हणतात. त्यांच्या प्रामाणिकपणाचे करावे तितके कौतुक थोडे. विशेषत: भारत-चीन तणावासंदर्भात ''ना कोणी आले, ना कोणी गेले'' अशा प्रकारचा दावा सर्वोच्च सत्ताधीश करत होते तेव्हाही जयशंकर हे संघर्ष असल्याचे मान्य करत होते. जयशंकर यांच्या प्रामाणिक निवेदनामुळे त्या पक्षातील लोकशाही वृत्तीचे दर्शन घडते, हीदेखील तशी हरखून जावे अशीच बाब. त्यामुळे निर्माण झालेली हरखावस्था कायम असतानाच जयशंकर हे विधान करतात. त्यातून आपल्या सैनिकांच्या गस्त घालण्याच्या अधिकाराचा संकोच चीनने केला, असा अर्थ ध्वनित होतो. म्हणजे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या भारतीय बाजूपर्यंत आपल्या सैनिकांना असलेला गस्तीचा अधिकार चिनी सैनिकांमुळे कमी झाला, असे. हे खरे असेल- आणि जयशंकर म्हणतात म्हणजे ते खरेच असणार- तर या चिनी अरेरावीमुळे आपला किती प्रदेश आक्रसला, हा प्रश्न पडणे नैसर्गिक. या तपशिलाशिवाय चिनी सैनिकांच्या कृतीमुळे आपल्या गस्ती इलाख्याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत, या वास्तवाचा अर्थ कसा लावायचा? पँगाँग तळे, गोगरा, देपसांग पठार आदी ठिकाणी गेल्या काही वर्षांत उभय देशांत संघर्ष झाला. त्यातून तणाव तर वाढलाच; पण 'आलेले' चिनी सैनिक परत न गेल्याने आपला गस्ती अधिकार कमी झाला, असे तज्ज्ञ म्हणतात.तथापि याच काळात उभय देशांतील व्यापार किती प्रचंड प्रमाणात वाढला हे सत्य अचंबित करते. हा व्यापार एकतर्फी अधिक. म्हणजे चीनमधून भारतात येणाऱ्या वस्तूंची संख्या, प्रमाण प्रचंड आणि त्यामानाने भारतीय बनावटीच्या चीनमध्ये विकल्या जाणाऱ्या चीजा अगदीच नगण्य. या अर्थवास्तवाचा सविस्तर धांडोळा 'लोकसत्ता'ने 'या विस्ताराचे काय?' या संपादकीयातून (६ सप्टेंबर) अलीकडेच घेतला. त्यातून भारत-चीन व्यापारातील विस्कळीतपणा समोर आला. जयशंकर यांच्या निवेदनातून सीमेवर विस्कटलेले वास्तव समोर येते. ते अमान्य करता येणे अवघड.

# परळी मतदार संघात मागितली उमेदवारी!

## पडघम:अॅड.शंकर चव्हाणांनी घेतली पक्षश्रेष्ठींची भेट

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. नेत्यांच्या गाठीभेटी, सभा, दौरे यांना वेग आला आहे. अशातच मंगळवारी बीड जिल्ह्यातील तरूण तडफदार कार्यकर्ते ड.शंकर चव्हाण यांनी राष्ट्रीय नेते खा.शरदचंद्र पवार यांची मुंबईतील निवासस्थानी भेट घेतली. ड.चव्हाण यांनी या भेटीत काय घडलं याबाबतची माहिती प्रसारमाध्यमांना दिली आहे. खा.पवारांच्या भेटीवेळी परळी विधानसभा मतदारसंघाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. महाविकास आघाडीकडून आपण स्वतः ही निवडणूक लढविण्यास इच्छुक आहोत. असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षानेच ही जागा लढवावी अशी अपेक्षा व्यक्त केली. याबाबत खा.पवार साहेब हे सकारात्मक विचार करतील अशी अपेक्षा आहे असे ड.शंकर चव्हाण यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली.

मुंबई येथे मंगळवार, दिनांक २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार यांची ड.शंकर शेषेराव चव्हाण यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत ड. शंकर चव्हाण यांनी ते स्वतः परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहोत असे सांगितले. साहेबांनी आपल्या स्वतःच्या सातत्यपूर्ण प्रभावी कामगिरी व कार्याची दखल घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी पवार साहेबांनी बीड जिल्ह्यातील परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा आणि अहवाल ड. शंकर चव्हाण यांच्याकडून जाणून घेतला. याप्रसंगी चव्हाण यांनी स्वतः चा अनुभव, केलेले कार्य यांची माहिती साहेबांना दिली. आपण आदरणीय पवार साहेबांची सदिच्छा भेट घेवून त्यांचे आशिर्वाद घेतले अशी माहिती ड. शंकर चव्हाण यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.



महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहोत असे सांगून याबाबत अधिक माहिती देताना सांगितले की, माझे संपूर्ण नांव ड.शंकर शेषेराव चव्हाण आहे. मी विधीज्ञ व उद्योजक आहे. माझे शिक्षण : एलएलबी, एमबीए-एचआर झाले आहे. मी जातीने मराठा आहे. मी व्यवसायाने वकील आहे. माझी स्वतः ची आयटी कंपनी आहे. रिअल इस्टेट मध्ये ही आपण काम करीत आहोत. माझे गांव नांदगाव पोस्ट सुगांव, तालुका अंबाजोगाई (जिल्हा बीड) हे आहे व ते परळी विधानसभा मतदारसंघात आहे. आपण संस्थापक : इन्फोडॅड टेक्नॉलालीज प्रा.लि., संस्थापक : दैनिक शिवजागर, (बीड, लातूर), सचिव : विश्वनाथ फाऊंडेशन, नांदगाव, संस्थापक : अपेक्स नेस्ट प्रॉपर्टीज पुणे, संस्थापक : साप्ताहिक जयवंती टाईम्स, बीड आहोत. मी यापूर्वी राजकीय क्षेत्रात कार्य करीत असताना शेतकरी कामगार पक्ष, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष म्हणून सन २०१५ ते २०१८ कार्यरत होतो. पत्रकारीता क्षेत्रात ही मला अनुभव आहे. पत्रकार म्हणून मी तालुका प्रतिनिधी : दैनिक समर्थ लोकनेता बीड (सन २०१४ पासून २०१५), तालुका प्रतिनिधी : दैनिक मराठवाडा साथी बीड (सन २०१५ पासून २०१६), सचिव : मराठी पत्रकार परिषद, मुंबई शाखा अंबाजोगाई (सन २०१४ ते २०१५), मराठवाडा विभागीय सदस्य : महाराष्ट्र पत्रकार संघ (२०१५ ते २०१६), संपादक जयवंती टाईम्स, २०१६ ते आजतागायत व संपादक शिवजागर, २०१९ ते आजतागायत चालू आहे. मला शासकीय सेवेचा अनुभव आहे. मी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर दि. ०४.०१.२०१ ते ०३.०८.२०२४ पर्यंत कनिष्ठ लिपीक म्हणून सेवा केली आहे. तर सध्या मा. जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे वकीली करीत आहे. मला २०१५-२०१९ अशी सलग पाच वर्षे राज्यस्तरीय पत्रकारीता पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ज्यात भारतीय पुरस्कार विजेते संघ, शोधपत्रकारीता व सामाजिक न्याय पुरस्कार, मुंबई भांडुप येथे (सन २०१५), पद्मश्री डॉ.मणिभाई राष्ट्रसेवा ऍवार्ड २०१६ व नेहरू युवा केंद्र मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने देण्यात येणारा 'पत्रकारीता पुरस्कार' लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारक पदमवती पुणे येथे (सन २०१६), अंबाजोगाई पत्रकार संघ (ता.अंबाजोगाई जि.बीड) दर्पण दिनानिमित्त (सन २०१७), पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल क्रांती ग्राम विकास संस्था व दैनिक विश्वनायक लोकसंसद यांच्या वतीने दिला जाणारा छत्रपती शिवाजी महाराज नेशन पॉवर अवॉर्ड - (सन २०१८) आणि संपादकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून वंचित घटकांना न्याय मिळवून देण्याची अविरत कार्य केल्यामुळे दैनिक कश्मकश व दिव्य वार्ता यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त देण्यात येणारा मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार २०१९ (सन २०१९) प्राप्त झाले आहेत. परळी विधानसभा मतदारसंघाचा मला चांगला अभ्यास आहे. मागील अनेक वर्षांपासून या मतदारसंघात माझा मोठा जनसंपर्क व मित्र, परिवार, नातेवाईक आहेत. मला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाकडून उमेदवारी मिळाली तर आपला विजय पक्का असल्याचे युवा नेते ड.शंकर चव्हाण यांनी सांगितले.

तसेच ड शंकर चव्हाण यांना परळी मतदारसंघात तरुणांचा फुल सपोर्ट सोशल मिडीयाच्या माध्यमातून मिळत असून, 'आमदार हवा तर चेहरा नवा' अशा स्टेटसचा धुमाकूळ पहावयास मिळत आहे. तरुण वर्गातून सकारात्मक विचार व विकासात्मक धोरण असणारे ड. शंकर चव्हाण असाच लोकप्रतिनिधी म्हणून परळी मतदारसंघाचा विकास करण्यासाठी हवा आहे असा उत्साहाचा सुर परळी मतदार संघातील जनतेकडून ऐकायला मिळत आहे. एकूणच परळी मतदार संघात ड. शंकर चव्हाण यांच्या नावाचीच चर्चा असून त्यांना विधानसेत पाठवण्यासाठी मतदारसंघातील जनतेची पसंती अधिक मिळत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे व परिवर्तनाची लाट सध्या पहावयास मिळत असल्याने नव्या चेहऱ्यांनाच जनता निवडुन देणार असल्याचं ठाम असल्याचं चित्र यावरुन लक्षात येतं.

# दहशतवाद्यांकडून मुंबईला धोका

## मोठ्या हल्ल्याची भीती, पोलीस अॅक्शन मोडवर

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

दहशतवाद्यांकडूनमुंबईला धोका असल्याची माहिती सेंट्रल एजन्सीकडून मुंबई पोलिसांना मिळाली. याच पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस सतर्क झाल्याचं पाहायला मिळत आहे. दहशतवाद्यांकडून मुंबईला धोका असल्याच्या माहितीनंतर मुंबई पोलीस अलर्ट मोडवर असून गर्दीची ठिकाणं आणि धार्मिक स्थळांवर मुंबई पोलिसांकडून करडी नजर ठेवली जात आहे. दहशतवाद्यांकडून मुंबईला धोका आहे, अशी माहिती सेंट्रल एजन्सी यांच्याकडून मुंबई पोलिसांना मिळाली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस सतर्क झाले आहेत आणि मुंबईत कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आपल्याला मिळालेल्या माहितीनुसार, गर्दीची ठिकाणी आणि धार्मिक स्थळांवर मुंबई पोलिसांकडून नजर ठेवण्यात येणार आहे. गर्दीच्या ठिकाणी आणि धार्मिक स्थळांवर'मॉक ड्रिल्स'करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शहरातील सर्व



डीसीपींना त्यांच्या-त्यांच्या झोनमध्ये सुरक्षा व्यवस्थेवर विशेष लक्ष देण्यास सांगण्यात आलं आहे.

एका अधिकाऱ्यानं सांगितलं की, शुक्रवारी पोलिसांनी क्रॉफर्ड मार्केट परिसरात मॉकड्रिल केलं, हा तो परिसर आहे. जिथे मोठी गर्दी होते आणि येथे दोन प्रमुख धार्मिक स्थळं आहेत. आगामी काळात विधानसभा आहे, या पार्श्वभूमीवर कोणत्याही दंगली किंवा गालबोट लागेल, असं काही होऊ नये यासाठी मुंबई पोलीस खबरदारी घेत होते. आणि त्यातच आता दहशतवाद्यांकडून धोका असल्याची माहिती मुंबई पोलिसांना मिळाली आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेता, मुंबई पोलिसांनी मुंबई शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. संभाव्य दहशतवादी धोक्यांबाबत केंद्रीय यंत्रणांनी दिलेल्या सतर्कतेनंतर मुंबई पोलिसांनी मुंबई शहरातील सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. या अलर्टनंतर धार्मिक स्थळे आणि इतर गर्दीच्या ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आल्याचं सूत्रांनी सांगितलं. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आम्हाला गर्दीच्या ठिकाणी आणि धार्मिक स्थळांवर 'मॉक ड्रिल' आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरातील सर्व डीसीपींना त्यांच्या संबंधित झोनमधील सुरक्षा व्यवस्थेकडे विशेष लक्ष देण्यास सांगण्यात आलं आहे.एका अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पोलिसांनी क्रॉफर्ड मार्केट परिसरात एक मॉक ड्रिल केलं. क्रॉफर्ड मार्केट परिसर म्हणजे, मुंबईतील अत्यंत वर्दळीचा भाग. या भागात दोन प्रमुख धार्मिक स्थळे देखील आहेत. अचानक एवढ्या मोठ्या प्रमाणात मॉक ड्रिल का केलं जात आहे, असा प्रश्न अनेकांना पडला होता. त्यानंतर सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील सर्व मंदिरांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत आणि खबरदारीचा उपाय म्हणून कोणत्याही संशयास्पद हालचालींची तक्रार करण्यास सांगण्यात आलं आहे.

# आत्महत्येस प्रवृत्त;दोघांवर गुन्हा दाखल

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचाळा येथील प्रौढाने गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना दि.२४ रोजी घडली होती. याबाबत आष्टी पोलिसांत आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

आष्टी तालुक्यातील चिंचाळा येथील भाऊसाहेब महादेव पोकळे (४५) याला गावातील बबन रामकिशन पोकळे, बाबू भाऊसाहेब पोकळे हे दोघेजण पैशांसाठी मानसिक त्रास देऊन ब्लॅकमेलिंगची कोर्टात केस करतो, अशी धमकी देत होते. त्यामुळे भाऊसाहेब याने २४ रोजी स्वतःच्या शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी बुधवारी मृताची बहीण अर्चना शिवाजी निंबाळकर (रा. खडकत, ता. आष्टी) हिच्या फिर्यादीवरून बबन रामकिशन पोकळे, बाबू भाऊसाहेब पोकळे (रा.चिंचाळा) यांच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कृष्णा

# गायरान धारकांसह व विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गायरान धारकांच्या प्रश्नांसंदर्भात राज्य सरकार ठोस भूमिका घेत नाही. शासनाने गायरान धारकांचे प्रश्न मार्गी लावावेत, या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीचे जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे नेतृत्वाखाली बुधवारी सिरसाळ्यातून पायी मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चामध्ये शेकडो गायरान धारकांचा समावेश होता.

गायरान धारकांच्या नावे व भोगवटा धारक यांच्या नावे पीटीआर देण्यात यावा, रमाई व पंतप्रधान घरकुलाच्या लाभार्थ्यांना ५ लाख रुपये देण्यात यावे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्यात यावा, सर्व मागासवर्गीय महामंडळांचे कर्ज माफ करण्यात यावे, शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, यासह इतर मागण्यांसाठी सिरसाळ्यातून २५ सप्टेंबर रोजी पायी मोर्चा काढण्यात आला होता.

हा मोर्चा आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. सदरील मोर्चा हा शैलेश पोटभरे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला होता. या मोर्चा विविध संघटनेने पाठिंबा दर्शवला गौतम दादा भालेराव मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे, करचुडीचे जयसिंग वीर व गावकरी,ऑल इंडिया पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, बसपाचे प्रशांत वासनिक व आंबेडकर संघटनेचा पाठिंबा लाँग मोर्चा दिला या मोर्चास उपस्थित कविता घोरपडे महिला मराठवाडा कार्य अध्यक्ष पंडित झिंजुर्डे, सचिव सीताताई भोसले, जिल्हाध्यक्ष महिला आघाडी व जिल्ह्यातील प्रमुख तालुका अध्यक्ष व गायरान धारक उपस्थित होते.

# पान एक वरून

### सासऱ्याच्या प्रेमविवाहाची

२ लाख ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. परंतु, अनेक वर्षे उलटल्यानंतरही त्यांनी हा दंड भरला नाही. त्यामुळे २१ सप्टेंबर रोजी शिवाजी पालवे (रा. धनगरवाडी, ता. नेवासा, जि. अहमदनगर) यांच्या मार्फत जात पंचायतमध्ये मालन यांना बोलावण्यात आले. ही पंचायत आष्टी तालुक्यातील डोईठाण येथे होती. त्याप्रमाणे त्या पती शिवाजी, मुलांसह तेथे पोहचल्या. या ठिकाणी पंचांसह समाजाचे ८०० ते ९०० लोक अगोदरच जमलेले होते. त्यादिवशी निर्णय झाला नाही.त्यानंतर २२ सप्टेंबर रोजी पुन्हा जात पंचायत बोलावली. सकाळी ११ पंचांसमारे उभे केले. सासऱ्याने दंड भरला नाही म्हणून तुम्ही भरा, असे सांगितले. तुम्ही दंड भरला नाहीत तर समाजातून तुम्हालाही बहिष्कृत करू, तसेच पोलिसांत तक्रार केल्यास जीवे मारू, अशा धमक्या दिल्या. शेवटी दंड भरू न शकल्याने पंचांनी मालन यांच्यासह त्यांच्या कुटुंबाला सात पिढ्या समाजातून बहिष्कृत करण्याचा आदेश दिला. त्यामुळे मालन यांनी आष्टी पोलिस ठाणे गाठत तक्रार केली. त्यावरून २५ सप्टेंबर रोजी पहाटे दीड वाजता नऊ जणांविरोधात सामाजिक बहिष्कार (प्रतिबंध व निवारण) अधिनियम २०१६ मधील जनतेचे महाराष्ट्र संरक्षण ४, ५, ६ तसेच बीएनएस १८९ (२), ३५१ (२) (३), ३५२ अशा कलमांन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

# पान सहा वरून

### बीडमध्ये होम मिनिस्टर

महिला-भगिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे येऊन आपल्या नाव नोंदणी करावी अथवा योगेश सारूक : ९१३२७३७४७५, अक्षय जगताप : ९७३०३७२२२२, नवनाथ बोबडे : ७०३०५६२५९०, दत्ता ताटे : ९५९५४३४४०५, लक्ष्मीकांत दोडके : ९९२२८३९७५३ यांच्याशी संपर्क साधून ऑनलाईन नाव नोंदणी करावी.

### बीडमध्ये मराठवाडा केसरी

आदीसह प्रेक्षकांच्या सुरक्षेसाठी बॅरेकेट बसवण्यात आले आहेत. तरी जिल्ह्यातील हौशी शेतकरी बांधवानी बैलगाडीचा थरार पाहण्यासाठी बहु संखेने उपस्थीत राहावे असे आवाहान राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. ऑनलाई नाव नोंदणीकरिता संपर्क - अविनाश नवले- ९९२१११४९५४, ९१३०८८७८८८, अजय सावंत - ९३५९००५८७९

### अजितदादाचा विश्वास

कार्यकर्ता म्हणून खामकर यांची ओळख आहे. तरुणाईचे मोठे संघटन त्यांनी उभे केले आहे. खामकर यांच्या या जमेच्या बाजू आहेत. ते प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होतात. त्यांची काम करण्याची वेगळी हातोटी आहे. या त्यांच्या अष्टपैलू कामाची दखल घेत फुले, शाहू, आंबडेकर यांचे विचार समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते खामकर यांची ओबीसी विभागाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड केलीप्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे व नगरचे लोकप्रिय आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष बळकट व मजबूत करणार

### तलवार बाळगणारा

सोबत घेऊन आष्टीत फेरफटका मारला असता त्यांनी तलवार बाळगणा-या तरुणास पाठलाग करुन तलवारीसह गजाआड केले. याप्रकरणी पोउपनि धनवडे यांच्या फिर्यादीवरून गुरुवारी आरोपी तन्वीर सलामत पठाण (वय ३४ रा. नागपूर तळ येरवडा पुणे ह.मु. दारूगल्ली आष्टी) याच्यावर पोलिस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोना हनुमान बांगर करीत आहेत.

### लाडक्या बहिणीच्या मदतीसाठी

राष्ट्रीयकृत बँका या फक्त श्रीमंत लोकांसाठीच नाही तर गोरगरीब जनतेसाठी सुद्धा सदैव तत्परतेने काम करत असतात आणि त्याचाच एक भाग म्हणून गोरगरीब महिला लाभार्थ्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने सुरू केलेली लाडकी बहीण योजना या योजनेपासून कोणीही वंचित राहू नये या योजनेचा सर्वांना वेळेत लाभ मिळावा म्हणून आम्ही बँक ऑफ महाराष्ट्रच्या ९० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आमच्या संघटनेच्या सभासदांना सुट्टीच्या दिवशी कसल्याही प्रकारचा मोबदला न घेता बँकेमध्ये जाऊन लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्याची शिल्लक असलेली उघडावयाची खाते उघडणे, त्यांच्या असलेल्या खात्याचे रिकेवायसीसी - केवायसी करणे अशा प्रकारचे कामे करण्यासाठी आवाहन केले आणि त्या आवाहनाला आमच्या संघटनेच्या सभासदांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला म्हणून दिनांक १४ सप्टें आणि २२ सप्टेंबर २०२४ रोजी बँकांना सुट्टी असूनही आमच्या -खइए- आणि -खइज- संघटनेच्या सभासदांनी बँक ऑफ महाराष्ट्राच्या संपूर्ण मराठवाडा विभागातील विविध शाखांमध्ये जाऊन लाडकी बहीण लाभार्थी योजनेची अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे जी संबंधित कामे अपूर्ण राहून गेली होती ती पूर्ण केली.

### परळी शहरात अवैध

प्रत्यक्षात भेटूनही कुठल्याच प्रकारची कारवाई न झाल्याच्या निषेधार्थ आज दिनांक २५/ ९/ २०२४ रोजी परळी येथील व्हीआयपी विश्रामगृहात बीड चे पोलीस अधीक्षक साहेब आले असता त्यांना लेखी निवेदन देऊन सदरील धंदे लवकरात लवकर बंद करण्यात यावेत अन्यथा २ ऑक्टोबर भीम नगर दारूबंदी कृती समितीच्या वतीने उपोषण करण्यात येईल असे लेखी निवेदन देण्यात आले असून या निवेदनावर माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर नगरसेवक नितीन रोडे सोपानराव ताटे गुत्तेदार अनिल मस्के उत्तम समुद्रे युवक नेते भारत ताटे अडवोकेट संजय जगतकर विलास आदोडे भैय्यासाहेब आदोडे महादू रोडे अंबादास रोडे बालासाहेब जगतकर आधीच्या सह्या असून सदरील धंदे बंद करण्यात यावेत याचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय बीड ,तहसीलदार तहसील कार्यालय परळी ,पोलीस निरीक्षक ,पोलीस स्टेशन परळी शहर. इत्यादींना देण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# माजलगावात खेळला जातो अवैध शूट

**हप्तेखोरी** — माजलगावमध्ये कारवाईची मागणी

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगावचे पोलीस निरीक्षक सूर्यतळ म्हणजे मला पहा आणि फुलपान वाहा राहुल सुर्यतळ यांनी शहर पोलिस ठाण्याचे सूत्र हाती घेतल्यापासून कायदा म्हणजे नेमका काय असतो अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अवैध धंदे वाल्यांनी डोके वर काढले असून बॉल च्या साह्याने खेळला जाणारा शूट नावाचा जुगाराने माजलगाव भागातील सामान्य नागरिक, महिलांना या अवैध धंद्यांचा अफाट त्रास होत असून अक्षरशा अवैध धंद्या वाल्या ची टवाळखोरी एवढी वाढली आहे की यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले असल्याचे नागरिकात बोलले जात आहे. माजलगाव शहरातील शुट,पत्याचे क्लब

बॉल च्या साह्याने खेळला जाणारा सूट नावाचा जुगारा सह अवैध धंद्याचा सुळसुळाट झाला आहे. शहरातील भागात प्रतिष्ठित लोकांची नगरी असून याच भागामध्ये कॉलेज, शाळा आहेत. अवैध धंद्यावाल्याच्या या टवाळ खोरी मुळे अनेक कॉलेजमधल्या मुलींनी आपले शिक्षण बंद करण्याची वेळ त्यांच्यावर आलेली आहे.



परिसरात पूजा आरती करण्याकरिता महिलांना याच रस्त्यावरून चालत जावे लागते तसेच या मेन रोड असल्याने ग्रामीण भागातील महिला भाज्या फळे विक्री करतात यांना मात्र या अवैध धंदे वाल्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.माजलगाव शहर हे अवैध धंद्याचा हॉटस्पॉट बनले असून नागरिकांना सहन करण्याची वेळ येत आहे. हे अवैध धंदे खुलेआम सुरू असूनही पोलीस प्रशासनाची हाताची घडी अन तोंडावर बोट आहे. अवैध धंदे पोलीस निरीक्षक यांच्या आशीवार्दाने मोठ्या प्रमाणात सुरू असून पोलीस कर्मचारी – हप्ते घेत असल्याची खमंग चर्चा आहे शहरात आहे. माजलगाव शहर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांचा अवैध धंद्या वरील वचक संपला असून त्यांचा प्रभाव शहरात फिका पडला असल्याचे दिसत आहे. शहर पोलीस स्टेशनच्या काही कर्मचाऱ्याचे या अवैद्य धंद्यावाल्याशी संबंध असल्याची चर्चा आहे. स्थानिक पोलिस अधिकारी मात्र कारवाई का करत नाही? हा प्रश्न शहरवासीयांना पडला आहे. आताबीडचेपोलीस अधिक्षकांनी माजलगाव शहरातील पोलीस कर्मर्यायांचे अवैध धंदेवाल्याशी असलेले लागेबांधे मोडीत काढून अवैध धंद्यावाल्या वर वचक निर्माण करण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. मात्र वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देऊन माजलगाव शहरातील भागातील अवैद्य धंद्यावर कारवाई करावी अशी मागणी जोर धरीत आहे.

### पोलीस निरीक्षकांना पडला विसर

असे ब्रीद पोलिसांच्या खाकी वर्दीवर लावलेले आहे. याचा अर्थ सामान्य जनतेला सुरक्षित ठेऊन 'खल'वृत्तीने वागणाऱ्यांना ठेचण्याचे काम पोलिसांनी करणे अपेक्षित आहे; परंतु राहुल सूर्यतळ यांनी ठाण्याचा कारभार हातात घेतल्यापासून पोलिसांना या ब्रीद वाक्याचा विसर पडलेला दिसतो. माजलगाव शहरात पत्याचे क्लब, अवैध शूट नावाच्या जुगारणे उच्छाद मांडला आहे. सदरक्षणाय खलनिग्रहण या ब्रीद वाक्याचा माजलगाव पोलिसांना विसर पडल्याचे बोलले जात आहे.

# अबॅकस स्पर्धेत पटकावला क्रमांक!

**स्पर्धा:** उज्वल गिते दुसरा तर एकलव्य गिते ने पटकवला तिसरा



दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

नॅशनल लेव्हल ऑनलाइन अबॅकस स्पर्धा ही चाणक्य अबॅकस नांदेड यांच्यामार्फत रविवारी (२२ सप्टेंबर) नुकतीच घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून दिंद्रुडचा विद्यार्थी उज्वल बाबूराव गिते याने ओपन ग्रुप बी मध्ये विभागात दुसरा क्रमांक पटकावला तर झेड जूनियर ग्रुप मध्ये एकलव्य गिते याने तिसरा क्रमांक पटकावत यश मिळवले.

या स्पर्धेत मराठवाड्यातील बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, संभाजीनगर,जालना आणि धाराशिव जिल्ह्यातील हजारो अबॅकस चे विद्यार्थी सहभागी झाले होते. दिंद्रुड (ता. माजलगाव) येथील ज्ञानदीप कोचिंग क्लासेसचे ३५ विद्यार्थी सहभागी झाले होते.या स्पर्धेचा निकाल गुरुवारी (दि.२६ सप्टेंबर) जाहीर करण्यात आला. येथील क्लासेसच्या आयुष राजेंद्र मुसळे ने ए सिनीयर ग्रुप व इ ओपन ग्रुप मध्ये स्नेहल केशव जायभाये या दोघांनी हाईघ फाईव्ह रँक ची ट्रॉफी जिंकून यशाला गवसणी घातली. या स्पर्धेत श्रुती अंधारे,श्रीनिवास सोळंके, सुशेन होरमाळे, स्वराज गायकवाड, रामेश्वर केंद्रे, संचिता आडे, वेदिका खाडे, संकेत आडे, सोनाक्षी पवार, यश किचमे, शुभम तिडके, यशराज गरड या विद्यार्थ्यांनी मॅथ मेस्ट्रो ट्रॉफी तर अथर्व बडे, सार्थक चांदबोधले, साक्षी पांढरे, किशोर तिडके ने स्टार परफॉर्मर ट्रॉफी पटकावली. सत्यम फपाळ, शिवम फपाळ, शिवम खाडे, अमरनाथ शेप, ओमकार शेजुळ श्रुती अंधारे आणि स्नेहल जायभाये यांना अबॅकस च्या आठ लेवल पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व यशस्वी आणि सहभागी स्पर्धकांचे ज्ञानदीप कोचिंग क्लासेस वतीने संचालक प्रा. बाबुराव गिते आणि उषा गिते यांनी अभिनंदन केले.

# केजमध्ये मिळतोय वाढता पाठिंबा!

**पडघम:** अंजली घाडगेंचे पारडे जड



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील शेतकरी दिवसभर शेतात राबराब राबून आलेले गावकरी शेतकरी आणि शेतमजूर हे रात्री दहा वाजले तरी तरी आपल्या लेकीची प्रतीक्षा करीत थांबले त्या एकदा कधी येतील आणि डोळे भरून पाहून थरथरत्या हातांनी आशीर्वाद देन्यासाठी डोळे रस्त्याकडे करून काठीचा आधार घेत थांबलेले गावकरी. आता विधान सभेच्या निवडणुकीला महिना दीड महिन्याचा कालावधी उरलाय निवडणुका कधीही जाहीर होवू शकतात. अशातच पीक काढणीला वेग आलाय त्यात पावसानेही जोर धरलाय म्हणून पीक कापणीला गावात माणूस मिळेना झाले. सकाळी दिवस निघायच्या पूर्वीचं शेतकरी, शेतमजूर हे शिळा भाकर तुकडा पदरात बांधून शेतावर जाताहेत रात्री साडेसात ते आठ वाजता घरी येवून घास तुकडा पोटात धकलून धरणीला अंग टाकतात. पण केज विधानसभा मतदार संघाच्या शेवटी असलेले पठाण मांडावा, साकुड या गावात बघायला मिळाले की, रात्री दहा वाजले तरी गावकरी समाज मंदिर, आणि मस्जिदमध्ये कुणाची तरी वाट पहात आहेत. आया–बाया चूल पेटवून भाकर तुकडा थापण्या ऐवजी रस्त्याकडे डोळे लावून कुणाची तरी वाट पहात होत्या. रात्री सुमारे १०:०० वा. च्या दरम्यान अंधारात एका गाडीचा प्रकाश दिसल्या बरोबर त्यांचे डोळे वेध घेतात आणि गाडी जवळ येवू थांबताच त्यातून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या डॉ. अंजलीताई घाडगे उतरतात. गाडीतून खाली उतरताच ज्येष्ठांचे दर्शन घेतात. त्या नंतर तेच थर हात आशीर्वाद देण्या साठी डॉ. अंजलीताई घाडगे यांच्या गालावर फिरतात आणि गळ्यात पडून यशस्वी भव: असा आशीर्वाद देतात.दरम्यान हे लोकांचे प्रेम डॉ. अंजलीताई घाडगे यांना मिळत असून महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी कॉँग्रेसचे शरद पवार यांच्यावर लोकांचा विश्वास असल्याने आज गावो–गावी आणि खेड्या–पाड्यात वाड्या–वस्त्या तांड्यावर रात्री–अपरात्री वेळी–अवेळी डॉ अंजली ताई घाडगे या मतदार संघातील कोणत्याही गावात गेले तरी तेवढ्याच प्रेमाने त्यांचे स्वागत होत आहे.यावेळी बदल निश्चित असून त्या महाविकास आघाडीच्या डॉ. अंजलीताई घाडगे यांनी मतदार संघ ढवळून काढला आहे. आता त्यांच्या उमेदवारीची सर्वत्र चर्चा सुरू झाल्याने त्यांचे पारडे जड झालेले आहे.

# लोकशाही भारताचे मूळ शिवभारतात

**सत्येंद्र तेलतुंबडे :** राहुरीत संकल्प दिन उत्साहात

राहुरी/पुण्यभुमी प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले आणि अधिकृत चरित्र परमानंद पुरी यांनी शिवभारत नावाने लिहिले आहे त्यातच आपल्या लोकशाही भारताचे मुळ आहे असे प्रतिपादन इतिहास संशोधक सत्येंद्रजी तेलतुंबडे यांनी भारत मुक्ती मोर्चाच्या विद्यमाने आयोजित केलेल्या संकल्प दिन कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणातुन केले या कार्यक्रमासाठी शाहु फुले आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक शिरीष गायकवाड महात्मा फुले समता परिषदेचे मच्छिंद्र भाऊ गुलदगड विद्रोही चळवळीचे डॉ जालिंदर घिगे भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजयजी संसारे आदी उपस्थित होते



सदर कार्यक्रम भारत मुक्ती मोर्चाच्या विद्यमाने शिवराज्याभिषेक दिन सत्यशोधक समाज स्थापना दिन संकल्प दिन तसेच पुणे करार दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आला होता ज्येष्ठ मार्गदर्शक शिरीष राव गायकवाड यांनी बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश ज्योत टाकत संकल्प दिनाचे महत्त्व सांगितले या कार्यक्रमासाठी माजी प्राचार्य सुभाष पोटे सत्यशोधक लहुजी सेनेचे अध्यक्ष कांतीलाल जगधने सुगी फाउंडेशनचे संदीप कोकाटे रिपब्लिकन सेनेचे युवा जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जाधव सतिश फुलसौदर बाबा साठे मेघराज बचुटे इमरान भाई देशमुख समता दूत एजाज पिरजादे बंडू आनंदकर महेश साळवे आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय संसारे यांनी केले.

# सोयगाव शहरांवर ड्रोन कॅमेरा

**भयभित:** रात्री नऊ वाजेची घटना

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहरासह आमखेडा, घोसला, नांदगाव नांदगाव तांडा या चार गावांवर शुक्रवारी रात्री नऊ ते साडे नऊ वाजेच्या सुमारास द्रोण कॅमेऱ्यात शहर व ग्रामीण भागात रेकी करण्यात आल्याचा प्रकार शुक्रवारी रात्री नऊ वाजता एका पादचाऱ्यांने रंगेहाथ पकडले मात्र ड्रोनला ऑपरेट करणाऱ्या चार ते पाच जणांनी त्या पायी जाणाऱ्या इसमाला घाबरविन्या साठी त्याचा पाठलाग केला त्यामुळे भेदरलेल्या अवस्थेत त्या पादचाऱ्याने शहर गाठले

सोयगाव शहरासह आमखेडा व इतर तीन गावात रात्री नऊ वाजेच्या सुमारास अज्ञात चार



ते पाच जणांनी द्रोण कॅमेरे द्वारे शहराची व ग्रामीण भागाचा रेकी केल्याच्या चर्चेने शहरात रात्री खळबळ उडाली होती त्यामुळे शहर वासीयांच्या मनात धडकी भरली आहे मात्र या द्रोण ला ऑपरेट करणाऱ्या चार ते पाच जनांना एका पायी जाणाऱ्या इसमाने रंगेहाथ पहिल्या वर त्यांनी त्याचा पाठलाग केला मात्र घाबरलेल्या अवस्थेत त्या इसमाने गाव गाठले होते या घटनेमुळे शहरात रात्रभर घबराटीचे वातावरण होते.

# शेतकरी संवाद यात्रेला सुरुवात

**सुनील गुट्टेंची:** शेतकऱ्यांच्या होणार भेटी



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकरी,पुरोगामी विचाराला केंद्र बिंदुमानुन जाणते राजे खा.शरदचंद्रजी पवार साहेबानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची निर्मिती केली याच धोरणात्मक विचाराची प्रेरणा घेऊन परळी मतदारसंघातील शेतकरी, शेतमजूरांना संवाद साधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या जेष्ठनेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते सुनील गुट्टे नेतृत्वात परळी मतदारसंघात शेतकरी संवाद यात्रेचे रविवार दि.२९ सप्टेंबर ते ९ आँक्टोंबर दरम्यान आयोजन करण्यात आले असल्याचे सौ.सुदामतीताई गुट्टे यांच्या संपर्क कार्यालयाने कळविले आहे.

युवानेते सुनील गुट्टे यांच्या नेतृत्वात परळी मतदारसंघातील डिग्रस येथून या शेतकरी संवाद यात्रेला रविवार दि.२९ सप्टेंबर रोजी सकाळी प्रारंभ होणार असुन ९ आँक्टोंबर रोजी परळी येथील प्रभु वैद्यनाथ मंदिर येथे समारोप होणार आहे हि यात्रा जवळपास पुर्ण परळी विधानसभा मतदारसंघात जाणार आहे.सलग ९ दिवस,९ मुक्काम,८६ गावे,४२३ कि.मी. अंतर कापत ही शेतकरी संवाद यात्रा शेतकरी, शेतमजूरांशी संवाद साधणार आहे.असे युवानेते सुनील गुट्टे यांनी सांगितले आहे. या यात्रेच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर यांच्या प्रश्ना विषयी संवाद, पीक विमा,अनुदान,अदी शेती विषयी शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी समजून घेऊन शासन दरबारी मांडुन ख–या अर्थाने जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकरी माय बाप जनतेला न्याय मिळवण्यासाठी ही यात्रेची संकल्पना असल्याचे युवानेते सुनील गुट्टे यांनी सांगितले.

# अंबाजोगाईचे कार्यकर्ते होणार सामिल!

**नियोजन:** दशरथ सोनवणे, प्रमोद दासूद यांची माहिती



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळा बीड शहरात रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे होणार आहे.

मंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी अंबाजोगाई तालुका रिपाइंच्या वतीने गावा–गावात बैठका होऊन भव्य सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरात होणाऱ्या ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळ्यात अंबाजोगाई तालुक्यातून रिपाइं पदाधिकारी, महिला गायरान धारक कार्यकर्ते, हजारोच्या संख्येने सामील होऊन शक्ती प्रदर्शन करणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकार द्वारे रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष दशरथ सोनवणे, प्रमोद दासुद, राहुल गंडले, किरण खंडागळे आदींनी दिली आहे.

**भयभित** — ग्रामस्थांनी धाडसाने वाहन पकडले पण चोर पसार झाले

# चोरट्यांचा गायी चोरीचा डाव फसला

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव जवळील आमखेडा व लगतच्या पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव( हरे) येथून दोन गायी चोरून सुसाट पळालेल्या वाहनाला ग्रामाथांच्या मदतीने शुक्रवारी पहाटे मोहलाई गावाजवळ पकडले परंतु अज्ञात तीन चोरटे मात्र फरारी झाल्याची घटना शुक्रवारी पहाटेच्या दरम्यान घडली आहे सोयगाव पोलिसांनी वाहन जप्त करून दोन्ही गायी पशुपालकांच्या ताब्यात दिल्या आहे

कवली गावापासून या चोरट्या च्या वाहनाचा ग्रामस्थांनी शुक्रवारी रात्री तीन वाजेपासून पाठलाग सुरू केला घोसला, नांदगाव, तिडका,बनोटी आदी गावात ग्रामस्थांनी सापळा रचून तिडका गावाजवळील पोलिसांनी आडवे लावलेले बॅरिकेट उडवून अज्ञात चोरट्यांनी सुसाट वेगाने वाहन चालवून अखेर बनोटी दुरक्षेत्राचे उपनिरीक्षक रजाक शेख यांनी ग्रामस्थांच्या मदतीने मोहलाई गावाजवळ नागद रस्त्यावर



या वाहनाला पकडले मात्र वाहनातून अज्ञात चोरटे अंधाराचा फायदा घेऊन फरारी झाले आहे आमखेडा गावातून एक गाय वाहनात टाकून फरार झालेल्या अज्ञात चोरट्यांनी पिंपळगाव (हरे) येथून दुसरी गाय चोरताच त्यांनी पिंपळगाव (हरे) पासून कवली ता सोयगाव मार्गे बनोटी कडे पळ काढला मात्र पिंपळ गाव च्या ग्रामस्थांनी सजग होऊन सदर वाहनाचे वर्णन फोन वर सांगून गावागावात नागरिकांना सतर्क केले त्यामुळे कवली ते मोहलाई या चाळीस की मी अंतरावर पाच गावातील नागरुकांनी या वाहनाचा पाठलाग केला अखेर ते चोरट्यांचे वाहन उपनिरीक्षक रजाक शेख,जमादार राजू बर्डे,संदीप सुसर यांच्या सह ग्रामस्थांनी शिताफीने बनोटी–नागद रस्त्यावर मोहलाई गावाजवळ पकडले परंतु तीन अज्ञात चोरटे वाहनातून फरारी होण्यात यशस्वी झाले आहे

जनावरे चोरीच्या टोळक्याने चक्क चारचाकी वाहनाला दुचाकी चा नंबर लावून ही चोरी केली असल्याचे पोलीस चौकशीत निदर्शनास आले आहे जनावरे चोरणाऱ्या टोळक्यानी वापरलेल्या एक्स यु आई ५०० या चारचाकी वाहनाला एम एच–१५ ई एन–६०६८ हा दुचाकी चा बनावट नंबर लावून वाहनाचा चोरी चया गुन्ह्यात वापर केला असल्याचे उपनिरीक्षक रजाक शेख यांनी सांगितले याप्रकरणी बनोटी दुरक्षेत्राचे उपनिरीक्षक रजाक शेख राजू बर्डे संदीप सुसर आदींच्या पथकाने घटनास्थळी पंचनामा करून चोरीच्या गुन्ह्यात वापरलेल्या वाहन व दोन जनावरे हस्तगत केले आहे. घटनेची नोंद सोयगाव पोलीस ठाण्यात घेण्यात आली आहे.

# कोट्यवधीचा विकास केला मग निधी कुठे?

**चर्चा:** जलपुंजन करायला गेलते का भ्रष्टाचारी विकास सांगायला?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज विद्यमान आमदार नमीता मुंदडा व सासरे मांजरा धरनाचे जलपुंजन करण्यासाठी गेले असता त्यांनी केज अंबाजोगाई मतदार संघाचा एवढा विकास केला तेवढा विकास केला कोट्यवधी रुपयांचा निधी मतदार संघा साठी आणला असे बोलताना विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांचे पत्रविर सासरे नंदकिशोर मुंदडा म्हणाले तरी नंदकिशोर मुंदडा कोट्यवधी निधी च्या विकासाची भाषा करतात आमदारा सासरे नंदकिशोर मुंदडा यांना शोभत नाही कारण कोट्यवधी रुपयांचा भ्राष्टाचार करुन मतदार संघ लुटुन जनतेला वेड्यात काढणारे नंदकिशोर मुंदडा आहेत तसेच महावितरण कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडवल्या असे बोलताना आमदार सासरे



यांनी जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगून बोलले पाहिजे कारण डीपी तालुक्यातील शेतकऱ्यांचा डीपी जळाला तर एक महीने दोन महिने मिळत नाही मग आमदारा सासरे यांनी काय समस्या सोडवल्या शेतकऱ्यांच्या व आमदारा सासरे मांजरा धरणाचे जलपुंजन करायला गेले होते का कोट्यवधी रुपयाचा निधी भ्राष्ठचार करुन पाण्यात सोडायला गेले होते कारण जलपुंजन करण्यासाठी गेलेल्या आमदारा सासरे यांनी कोट्यवधी रुपयांचा विकास केला आहे अशी भाषा कोट्यवधी रुपयांचा भ्राष्टाचार करणाऱ्या विद्यमान आमदार नमीता यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा यांनी जगाला सांगतात जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगून बोलावे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**सुविचार-** मोठ्या गोष्टीचे बेत करण्यापेक्षा छोट्या गोष्टीने आरंभ करणे अधिक श्रेयस्कर ठरते.

## नेत्यान्याहूंचा प्राणवायू........!

जोपर्यंत इस्राएल युद्धात व्यस्त आहे तोपर्यंत इस्रायलच्या पंतप्रधानपदी नेत्यान्याहू कायम आहेत आणि या वस्तुस्थितीची जाणीव असल्यामुळेच इस्रायल म्हणजेच पंतप्रधान नेत्यानाहू एकामागून एक नव्या नव्या युद्ध आघाड्या सुरू करीत असल्याचे दिसते. मागे एकदा त्यांच्या संरक्षणमंत्र्यांनी थोडे सबुरीने घेण्याचा सल्ला दिला तर त्यांनाच मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची धमकी नेत्यान्याहू यांनी दिली होती. आता एकीकडे हमासच्या विरोधात गाजा पट्टीत लष्करी कारवाई सुरू असतानाच आता इस्रायलने लेबनॉन सीमेवर नवा मोर्चा उघडला आहे. गेल्या काही दिवसात इस्रायलने लेबनॉनवर अनेक हवाई हल्ले केले. त्याआधी पेजर आणि वॉकीटॉकीत स्फोट घडवून इस्रायलने लेबनॉनमध्ये दहशत निर्माण केली होती. तिथे परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की भारत सरकारने बैरूतमधील भारतीय नागरिकांना त्वरित देश सोडण्यास सांगितले आहे. त्याचबरोबर लोकांना अत्यंत सावध राहण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. लेबनॉन आणि इस्रायलमध्ये गेल्या आठ दिवसांत प्रचंड तणाव निर्माण झाला आहे. इस्रायलने केलेल्या हल्ल्यात आतापर्यंत जवळपास हजार लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यात हिजबुल्लाचे दहशतवादी किती आणि सामान्य नागरिक किती त्याचा उलगडा झालेला नाही; परंतु सामान्य लोकांच्या मृत्यूचे प्रमाण निश्चितच अधिक आहे. आतातर इस्रायली लष्कर लेबनॉनमध्ये घुसखोरी करण्याच्या तयारीत आहे. अशा स्थितीत मध्यपूर्वेत आणखी एका युद्धाचा भडका उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इस्रायलचे लष्करी प्रमुख हरजाई हलेवी यांच्या मते लेबनॉनमध्ये त्यांच्या हवाई हल्ल्यांचा उद्देश हिजबुल्लाच्या पायाभूत सुविधा नष्ट करणे आणि जमिनीवर घुसखोरीचा मार्ग शोधणे हा आहे. इस्त्रायली सैन्याने बुधवारी रात्री उशिरा हिजबुल्लाच्या ७५ ठिकाणांवर हल्ला केला. या हल्ल्यात किमान ७२ लोकांचा मृत्यू झाला. हे संभाव्य युद्ध थांबवण्यासाठी अमेरिका आणि फ्रान्सने बुधवारी २१ दिवसांच्या युद्धबंदीची मागणी केली. या युद्धासंदर्भात न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्र महासभेत तातडीची बैठक बोलावण्यात आली होती. अमेरिका आणि फ्रान्ससह ऑस्ट्रेलिया, कॅनडा, सौदी अरेबिया, यूएई, कतारसह अनेक युरोपीय देशांनी युद्धबंदीची मागणी केली आहे. अर्थात हिजबुल्लाह, लेबनॉन किंवा इस्रायलने अद्याप तरी या मागणीला कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन युद्धविरामासाठी प्रयत्न करीत असले तरी अमेरिकेच्या या प्रयत्नामागे प्रामाणिक इच्छा किती आणि राजकारण किती हादेखील संशोधनाचा विषय आहे. मध्यपूर्वेतील युद्ध थांबवण्यासाठी बायडेन यांच्यावर खूप दबाव असल्याचे बोलले जात आहे. बायडेन आता फार तर चार महिने अध्यक्ष पदावर राहतील. त्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना इस्रायल किती गांभीर्याने घेतो हादेखील एक प्रश्न आहे. बायडेन यांना असे वाटत आहे की हे युद्ध थांबवण्यात आपल्याला यश आले तर त्याचा फायदा आपली प्रतिमा सुधारण्यासोबतच येत्या निवडणुकीत आपल्या डेमोक्रॅटिक पक्षालाही होऊ शकतो. अर्थात इथे अमेरिकेची दुटप्पी भूमिकादेखील समोर येत आहे. एकीकडे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष मध्यपूर्वेतील युद्ध थांबवण्याचा प्रयत्न करत असले तरी दुसरीकडे अमेरिका युद्धासाठी इस्रायलला घातक शस्त्रेही पुरवत आहे. या शस्त्रांच्या मदतीनेच इस्रायलने गाझामध्ये चाळीस हजारांहून अधिक लोकांचा बळी घेतला आहे. युद्ध हे कोणत्याही प्रश्नाचे शेवटचे उत्तर नसले तरी जगभरात युद्धखोरीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसते. यामागे अर्थातच राजकीय कारणे, काही लोकांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, आर्थिक कारणे अशा अनेक घटकांचा समावेश आहे. आज युद्धबंदी किंवा युद्धविरामासाठी प्रयत्नशील असल्याचे दाखवणाऱ्या अमेरिकेनेच अनेक देशांवर भूतकाळात युद्ध थोपले आहे. जगभरात जिथे कुठे संघर्ष सुरू असल्याचे दिसते, तिथे कोणत्या ना कोणत्या प्रकारे अमेरिकेचा हात दिसून येतो. अमेरिका हा शस्त्रांचा सगळ्यात मोठा व्यापारी आणि निर्यातदार देश आहे. आपली तिजोरी भरण्यासाठी अमेरिकेला शस्त्रांची निर्यात सातत्याने करावी लागते आणि ही निर्यात कायम राहायची असेल तर जगात कुठे ना कुठे युद्ध सुरू असणे हे अमेरिकेची गरज आहे. आज इस्रायल जी काही दादागिरी दाखवीत आहे ती निव्वळ अमेरिकेच्या जोरावर. अमेरिकेने थोडे जरी डोळे वटारले तरी इस्रायल तात्काळ शेपूट घालून बसेल अशी परिस्थिती आहे; परंतु मध्यपूर्वेतील आखाती देश आणि एकूणच मुस्लीम देशांवर आपला अंकुश कायम राखण्यासाठी अमेरिकेला इस्रायलची गरज आहे आणि अमेरिकेची ही मजबुरी इस्रायलनेसुद्धा व्यवस्थित ओळखली आहे. तिकडे नेत्यान्याहू यांना आपल्या पंतप्रधानपदाची काळजी आहे. त्यामुळे त्यांना हे युद्ध सतत भडकत ठेवावे लागणार आहे. सध्या तरी पंतप्रधान पदाच्या दृष्टीने युद्ध हा नेत्यान्याहू यांच्यासाठी प्राणवायू झाला आहे.

## चाणक्य तोंडघशी......!

अजित पवारांना सोबत घेतल्यामुळे भाजपमधील अनेक नेते आणि कार्यकर्ते नाराज होते, संघालाही भाजपचा हा निर्णय मान्य नव्हता अशी सार्वजनिक कबुली कदाचित पहिल्यांदाच देवेंद्र फडणवीस यांनी दिली असावी. सुमारे दीड वर्षापूर्वी अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४० आमदारांनी सत्ताधारी भाजपा व शिंदे गटाशी हातमिळवणी केली. अजित पवार सोबत आल्यामुळे लोकसभा निवडणुकीत फायदा होईल, त्यावेळी समोर ठेवलेले ४५ चे लक्ष्य सहज गाठता येईल, असे काहीसे गणित त्यावेळी भाजप नेत्यांनी मांडले असावे. राष्ट्रवादीचे बहुसंख्य आमदार अजित पवारांसोबत असल्याने शरद पवारदेखील सहज शरणागती पत्करतील, असाही एक होरा भाजप नेत्यांचा होता. तसे जर झाले असते तर कदाचित या खेळीचा 'मास्टर स्ट्रोक' म्हणून उदोउदो झाला असता. संघानेही चाणक्यनीती वगैरे म्हणत फडणवीसांचे कौतुकच केले असते; परंतु शरद पवारांनी भाजपच्या चाणक्याचा डाव उलटवला आणि तो असा काही उलटविला की, आपल्या त्या खेळीचे समर्थन करताना फडणवीसांच्या नाकीनऊ येत आहे आणि आपण शरद पवारांची साथ सोडून नेमके काय साध्य केले, या प्रश्नाच्या उत्तरात अजित पवार अजूनही चाचपडत आहेत. मुळात शिंदेसोबत मजबूत बहुमत असलेले सरकार असताना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडण्याची काहीच गरज नव्हती; परंतु विरोधक संपवायचे, राजकारणात स्पर्धाच शिल्लक ठेवायची नाही, या लोकशाहीच्या दृष्टीने क्रूर विचाराने झपाटलेल्या भाजप श्रेष्ठींना त्यावेळी कशाचेच भान नव्हते. फडणवीसांच्या मनातदेखील उद्धव ठाकरेंसोबतच शरद पवारांचाही हिशेब चुकता करण्याची खुमखुमी होती, कारण या दोघांमुळेच त्यांचे मुख्यमंत्री पदाचे स्वप्न भंगले होते. त्यामुळेआधी शिवसेना फोडल्यानंतर तशी कोणतीही राजकीय गरज नसताना केवळ सूडबुद्धीने फडणवीसांनी राष्ट्रवादी पक्षदेखील फोडला. अर्थात मोदी-शाहांचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता. या फोडाफोडीच्या राजकारणाला तत्कालिक यश मिळाले; परंतु लोकसभा निवडणुकीत या कुटील राजकारणाचा जबर फटका भाजपला बसला आणि आतादेखील हे राजकारण भाजपच्या अंगाशी येत असल्याचे दिसते. अजित पवारांसाठी ज्या जागा सोडायच्या त्या मतदार संघातील अगदी जुनेजाणते भाजप नेते आपले राजकारण टिकविण्यासाठी 'तुतारी' हातात घेण्याची तयारी करीत आहेत. एकूण काय तर चाणक्य तोंडघशी पडले आहेत.

## लोकनामा




**भूपेंद्र गणवीर**

9834245768

ज्येष्ठ पत्रकार, नागपूर.


# राजकीय खेळीत नवे दोन पत्ते...!

२०१९ च्या निवडणुकीत हरियाणात चौटाला घराण्यात फूट पडली. दुष्यंत चौटाला यांनी काका अभय चौटाला विरूद्ध दंड थोपटले. तेव्हा दुष्यंत यांनी भाजपला यमुना पार हटवूची घोषणा केली होती. या जोरावर जेजेपीला दहा जागा मिळाल्या. काका अभय चौटाला यांच्या पक्षाचा दारूण पराभव झाला. दुष्यंत चौटाला यांच्या मदतीने भाजप सत्तेत आली. साडेचार वर्ष सत्ता भोगली. दुष्यंत यांनी उपमुख्यमंत्रिपद भूषविले. निवडणुका जवळ येताच पाठिंबा काढला. आता जेजेपी विरोधात रोष आहे. ती पोकळी भरून काढण्याची संधी इनोलोकडे होती. गोपाल कांडामुळे हे भिंग फुटले. उत्तर प्रदेशातून चंद्रशेखर रावण निवडून आले. बसपाला खाते उघडता आले नाही. त्या राज्यातून ते खासदार बनले. ते जेजेपीच्या जाळ्यात अडकले. त्यांची किंमत मोजावी लागेल. हे घडविणारे छुपे कोण आहेत. हरियाणात जाट आणि दलितांचे पक्ष तीन आघाड्यात विभागलेत. ते बळी पडतात की टाकणाऱ्यांचे फासे उलटे पडतात, ते निकालाअंती दिसेल. आपचे अरविंद केजरीवाल यांची कॉंग्रेससोबत आघाडी न होणे. तेव्हाच जमानत मिळणे. या घटना बऱ्याच बोलक्या आहेत.

राजकारण जिंकण्यासाठी असते. सरळ लढतीत जिंकणे अवघड बनते. तेव्हा छुप्या चाली चालल्या जातात. त्यात चर्चित वोट कटाऊ चाल. या चाली भाजपच्या अंगवळणी पडल्या. त्या सत्ताबळ आणि धनबळाच्या जोरावर फोफावल्या. निवडणुकीच्या दोन टप्प्यात किमान चार चाली नक्की असतात. जम्मू-काश्मीर निवडणुकीत कॉंग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सची हवा दिसली. त्याबरोबर टेरर फंडच्या आरोपाखाली कारागृहात असलेले इंजिनिअर रसीद यांना जामीन मिळाला. स्वतःच्या प्रचारासाठी बाहेर सोडले नव्हते. आता उमेदवारांच्या प्रचारासाठी मोकळे सोडले. त्यांच्या अवामी इत्तेहाद पार्टीने प्रतिबंधित जमाते इस्लामिक पार्टीसोबत आघाडी केली. आतापर्यंत जमाते-ए-इस्लाम पार्टी निवडणुकांवर बहिष्कार टाकीत आली. याशिवाय गुलाम नबी आजाद यांचा डीपीएपी, पिपल कॉन्फरन्स, पँथर पार्टीसुद्धा मैदानात आहे. कॉंग्रेस आघाडीचा खेळ बिघडविण्यास त्यांना रसद पुरविली जाते. पहिली चाल निवडणूकपूर्व असते. त्यात माणसं व पक्ष तोडफोडीचे राजकारण चालते. त्या अंतर्गत भाजपने विविध राज्यात अनेक पक्ष फोडलेत. राजकीय घराणी फोडली. बहुचर्चित हरियाणातील चौटाला आणि महाराष्ट्रात पवार घराणे फोडले. उद्धव ठाकरेंचा पक्ष फोडला. राकाँ आणि शिवसेनेत असली-नकलीचा वाद उभा केला. यास लोक विटले.

दुसरी चाल निवडणुकीत वोट कटाऊ उमेदवार देणे. ते लहान-मोठ्या पक्षांतील असतील किंवा अपक्ष असतील त्यांना रसद पुरविणे. त्यांच्या मार्फत न मिळणारी मते प्रतिस्पर्धी उमेदवाराला जाणार नाहीत, अशी तजवीज करणे. ही चाल जम्मू-काश्मीर आणि हरियाणात केली. त्या प्रकारांचा भंडाफोड झाला. छुपी गोष्ट बहुचर्चित झाली. हरियाणात गोपाल कांडा हे प्रभावी राजकारणी. त्यांनी भाजप, कॉंग्रेस विरोधात अपक्ष लढण्याची घोषणा केली. दिल्लीतून त्यांच्याकडे युती करण्याचा प्रस्ताव गेला. ते ११ सप्टेंबरला तातडीने दिल्लीला गेले. भाजपच्या चाणक्यांना भेटले तेव्हा त्यांना सांगण्यात आले. भाजपसोबत युती नाही. तुम्ही हरियाणाला परत जा. अभय चौटाला यांचा पक्ष इंडियन नॅशनल लोकदल आणि बसपासोबत युती करा. कांडा १२ सप्टेंबरला अभय चौटाला यांना भेटतात. दोघांच्या दोन दिवस गाठीभेटी चालतात. तिघांच्या युतीची घोषणा होते. गोपाल कांडा एका चॅनेलला मुलाखत देतात. हरियाणात आमच्या मदतीने भाजप सत्तेत येणार. सत्तेची चाबी आमच्या हातात राहणार. इनोलो, बसपा युतीचे गोपाल कांडा विरूध्द कॉंग्रेस उमेदवार अशा लढतीचे चित्र निर्माण होते. लगेच भाजप आपला उमेदवार वापस घेते. भाजप गोपाल कांडा यांना समर्थन जाहीर करते. या समर्थनाने कांडा युतीच्या अडचणीत भर पडते. आता गोपाल कांडा खुलासे करीत फिरत आहेत. भाजपला समर्थन मागितले नाही. त्यांचे समर्थन नको आहे. ही युती जेजेपीची पोकळी भरून काढणार. कॉंग्रेसच्या काही जागा पाडणार असे वाटत होते. छुपी दोस्ती उघड झाल्याने लढतींचे रंग बदलले. महाराष्ट्रातील गोपाल कांडा आ. बच्चू कडू आहेत. त्यांनी घेतलेला महाशक्ती हा शब्द कोणी दिला असेल ते लवकरच कळेल.

२०१९ च्या निवडणुकीत हरियाणात चौटाला घराण्यात फूट पडली. दुष्यंत चौटाला यांनी काका अभय चौटाला विरूद्ध दंड थोपटले. तेव्हा दुष्यंत यांनी भाजपला यमुना पार हटवूची घोषणा केली होती. या जोरावर जेजेपीला दहा जागा मिळाल्या. काका अभय चौटाला यांच्या पक्षाचा दारूण पराभव झाला. दुष्यंत चौटाला यांच्या मदतीने भाजप सत्तेत आली. साडेचार वर्ष सत्ता भोगली. दुष्यंत यांनी उपमुख्यमंत्रिपद भूषविले. निवडणुका जवळ येताच पाठिंबा काढला. आता जेजेपी विरोधात रोष आहे. ती पोकळी भरून काढण्याची संधी इनोलोकडे होती. गोपाल कांडामुळे हे भिंग फुटले. उत्तर प्रदेशातून चंद्रशेखर रावण निवडून आले. बसपाला खाते उघडता आले नाही. त्या राज्यातून ते खासदार बनले. ते जेजेपीच्या जाळ्यात अडकले. त्यांची किंमत मोजावी लागेल. हे घडविणारे छुपे कोण आहेत. हरियाणात जाट आणि दलितांचे पक्ष तीन आघाड्यात विभागलेत. ते बळी पडतात की टाकणाऱ्यांचे फासे उलटे पडतात, ते निकालाअंती दिसेल. आपचे अरविंद केजरीवाल यांची कॉंग्रेससोबत आघाडी न होणे. तेव्हाच जमानत मिळणे. या घटना बऱ्याच बोलक्या आहेत.

**'डंकी आणि गडकरी'**

हरियाणात किसान, जवान, पहेलवान व बेरोजगारी प्रश्नाभोवती निवडणूक फिरत आहे. नोकरीच्या शोधात चोरमार्गे १५ लाखांवर तरुण विदेशात गेलेत. त्यांचा भावनिक प्रश्न असलेला डंकी व्हिडिओ राहुल गांधी यांनी आणला. तो डोळ्यात आसवे आणणारा ठरला. संघाचे भाजपवर नियंत्रण आहे. त्या संघानेदेखील नवी खेळी चालली. मोदी मोहरा चालत नाही. हे दिसताच त्यांच्या दौऱ्यांना कात्री लावली. मदतीला आणखी दोन पत्ते टाकले. त्यात ज्येष्ठ मंत्री नितीन गडकरी आणि संजय जोशी आहेत. मोदी-शाह यांच्या महाराष्ट्र दौऱ्यात त्यांना गैरहजर ठेवले. गडकरींना जम्मू-काश्मीर, हरियाणात पाठविले. झारखंड व महाराष्ट्रात फिरविणार. तर जोशी यांना मध्यप्रदेशात बसविले. हे दोन पत्ते आणि कांडा आणि कडू या चार पत्त्यांच्या चालीला काय नाव देणार...! शिवाय काश्मिरात रसीद-नबी आहेत.

तिसरी चाल निकाल लागताच पळवापळवी. या तिन्ही चाली चालूनदेखील यश मिळाले नाहीतर. अंतिम चाल लोटस ऑपरेशन असते. लोक काय म्हणतील. लोकांना काय वाटेल. याकडे पूर्णतः कानाडोळा. येनकेनप्रकारेन सत्ता हवी. या खेळी जम्मू-काश्मीर, हरियाणा, झारखंड आणि महाराष्ट्रातसुद्धा खेळल्या जात आहेत. त्याची रंगित तालिम सुरू झाली. पडद्याआड एक-दोन पक्षांच्या आघाड्यांचा खेळ सुरू झाला. ज्या आघाड्यांचा फारसा प्रभाव नाही. चार टक्के मते पदरात पाडू शकत नाहीत. ते पक्ष किंगमेकर बनू. सत्तेची चॉबी आपल्या हातात असेल असे फुसके दावे करतात. त्या माध्यमातून समर्थकांमध्ये किंवा समाजामध्ये ऊर्जा भरून मते खातात. काही मतदार संघात एखाद्या पक्षाचा चार-दोन हजाराने फरक पडला. तर त्यात धन्यता मानणारे आहेत. आपल्या विध्वंसकतेचे भांडवल करीत असतात. हे राजकारणातील छुटपुट लढाईचे खेळ आता लोकांना कळू लागले.

लोकसभेत लोकांनी दाखवून दिले, तरी एक-दोन टक्के भाबडी जनता त्यांच्या आहारी जाते. लोक जसजसे शिकू लागले. तसे राजकारणाचे खेळ ओळखू लागले. राजकारण्यांचे असली नकली चेहरे बघू लागले. वोट कटाऊ नेत्यांचे चेहरे कालवंडले तरी हा धंदा थांबत नाही. विधानसभा क्षेत्र लहान असते. त्यामुळे हा धंदा आणखी वाढेल.

## वर्तमान


**इंजि. अरविंद गावंडे**

9423124671

सेवानिवृत्त उपअभियंता
सा. बां. विभाग, अमरावती


# परतवाडा-धारणी मार्गावर होणाऱ्या अपघाताला जबाबदार कोण?

समुद्राच्या खालून रस्ता बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाला परवानग्या मिळतात, पण धारणी रस्त्याकरिता कोणी नेता समोर येऊन पुढाकार का घेत नाही? सगळे आपापल्या मोहोल्यातच शेर आहेत. या रस्त्यावर इतके बळी जात असतानाही कोणत्याही आमदार खासदाराला आक्रमक आंदोलन का करावेसे वाटत नाही? आता जनतेनेच आपल्या लोकप्रतिनिधींना या दुर्घटनांसाठी कठोरपणे जाब विचारला पाहिजे. तरच हे विनाकारण सुरू असणारे बळीचे सत्र थांबू शकते.

परतवाडा-धारणी मार्गावर नुकताच अपघात झाला. त्यात ३ महिला व १ पुरुष ठार झाले. या रस्त्यावर पुलांच्या तीव्र वळणामुळे, तसेच रस्त्याच्या तीव्र वळणामुळे शेकडो लोकं जीवानिशी तर हजारो अपंग झालेले आहेत. परतवाडा-धारणी हा रस्ता बहुतांश लांबित वनविभागातून जातो. वनविभाग वनकायद्यामुळे रस्ता सरळीकरण, रुंदीकरण करण्यास परवानगी देत नाही. या अडचणीमुळे या रस्त्यावरील वळण मार्गाच्या सुधारणा होत नाही. याचा दोष आपण सरकारी यंत्रणेवर टाकून मोकळे होतो. सरकारी यंत्रणा-प्रशासन कामे सुचवतात. मंजूर करणे हे शासनाचे काम आहे. शासन मंजूर करताना, जागा उपलब्ध आहे काय हे प्रथम विचारते, त्यानंतरच काम मंजूर करते. वनविभाग सद्यस्थितीत असलेल्या जागेपेक्षा एक फूटही नवीन जागा देत नाही. म्हणून वळण मार्गाची सुधारणा करण्याचे काम प्रशासन सुचवत नाही आणि त्याचे दुष्परिणाम होऊन कित्येक लोकांना आपल्या प्राणाला मुकावे लागते. वनविभागाचे हे अडेलतट्टू धोरण अनेक लोकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरत आहे.

अमरावती-परतवाडा-धारणी हा रस्ता मा. नितीन गडकरी, मंत्री, भारत सरकार, यांनी राष्ट्रीय महामार्ग म्हणून सुधारणेसाठी मंजूर केला होता; परंतु ४-५ वर्षे जाऊनही भारत सरकारचा वनविभाग रुंदीकरण, सरळीकरण, नवीन पूल, सुधारणा करण्यासाठी लागणारी जागा उपलब्ध करून देण्यास तयार नसल्याने हा प्रस्ताव रद्द झाला. त्याचवेळी रिलायन्सने मात्र पूर्णपणे जंगलातून जेसीबीने खोदत नेऊन परतवाडा ते हरिसालपर्यंत पूर्णपणे केबल टाकली. तेव्हा त्यांना कोणी अडविले नाही. रिलायन्सकरिता वेगळा न्याय व व सामान्य लोकांसाठी वेगळा न्याय का? केंद्र सरकारमधील वनविभाग ऐकत नाही म्हणून हा जीवघेणा रस्ता दुरुस्त होणारच नाही का? नाही त्या ठिकाणी दंडेलशाही करून आपल्या मनमर्जीनुसार कामे करून घेणारे लोकनेते ह्यावेळी गप्प का बसतात? इतक्या लोकांचे बळी गेल्यानंतरही राजकीय नेते आक्रमक होऊन भूमिका का मांडत नाही? मेळघाटातील आदिवासी बांधवांची मते घेण्यासाठी अनेक पुढारी आदिवासीच्या प्रेमाचा पुळका आणतात; पण त्या आदिवासी बांधवांवर जीव गमावण्याची वेळ येते तेव्हा मात्र हे नाटकी पुढारी कुठे लपून बसतात? स्थानिक पातळीवर कामांचे श्रेय घेणारेही केंद्र शासनाकडून मंजुरी आणण्याचे कठीण काम मात्र सोईनुसार बाजूला टाकतात. दिल्लीच्या रस्त्यावर जेव्हा जनता उतरते तेव्हा, केंद्र शासनाला झुकावे लागते. आपल्याकडील नेते सोपे सोपे प्रश्न सोडवून आपला उदो उदो करवून घेतात; परंतु लोकांसाठी जीवघेणा ठरत असलेल्या परतवाडा-धारणी रस्त्याला सर्व जनतेला आवाहन करून, केंद्र शासनाला वन विभागाची मंजुरी घेण्यासाठी केव्हा भाग पाडणार?

सरकारी नियम जनतेच्या भल्यासाठीच आहेत. मग ते किचकट नियम जनकल्याणासाठी थोडे वळवून आणि लवचिक का करून घेतल्या जात नाहीत? सरकारी नियम आपल्या सोयीसाठी आणि स्वार्थासाठी वाकवून आणि वळवून घेणे हे तर आमच्या सर्वपक्षीय नेत्यांच्या अंगवळणी पडलेले आहे. रस्ते हे विकासाच्या नाड्या आहेत, हे वाक्य आम्ही लहानपणापासून ऐकत आलेलो आहोत. रस्ता सरळ आणि चांगला झाल्यास अमरावतीवरून धारणीला २ तासात पोहोचणे सहज शक्य होईल आणि आदिवासी भागाचा कायापालटसुद्धा होईल. समुद्राच्या खालून रस्ता बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाला परवानग्या मिळतात, पण धारणी रस्त्याकरिता कोणी नेता समोर येऊन पुढाकार का घेत नाही? सगळे आपापल्या मोहोल्यातच शेर आहेत. या रस्त्यावर इतके बळी जात असतानाही कोणत्याही आमदार खासदाराला आक्रमक आंदोलन का करावेसे वाटत नाही? आता जनतेनेच आपल्या लोकप्रतिनिधींना या दुर्घटनांसाठी कठोरपणे जाब विचारला पाहिजे. तरच हे विनाकारण सुरू असणारे बळीचे सत्र थांबू शकते.

## आदरांजली


**ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक**

9823966282

सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वाङ्मय प्रकाशन समिती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ


# सर, एवढी घाई का केली?



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांची गुरुवार, दि. २६ सप्टेंबर रोजी प्राणज्योत मालवली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देणारा लेख...

डॉ. सुभाष चौधरी सर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून आपण रूजू झालात. आम्ही श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते प्रथम भेटायला आलो. आपल्या कॅबिनमध्ये प्रवेश केला. आपण प्रथम विचारले, 'आपल्यामध्ये ज्ञानेश्वर रक्षक कोण आहेत?' तुमची माझी पहिली भेट. आपण चर्चेत सांगितले, 'विद्यापीठाने राष्ट्रसंतांचे नाव धारण केले, त्यांचे विचार गावखेड्यांमध्ये-उपेक्षितांमध्ये, प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये पोहचवणे आमचे काम आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमच ग्रामगीतेच्या विचारातून जनमानसात पोहचावे, असा माझा प्रयत्न आहे.' सर, अनेक अडचणीवर मात करत आपण सातत्याने राष्ट्रसंत तुकडोजी अध्यासन आणि विचारधारा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यातून राष्ट्रसंतांच्या विचारांची पेरणी करण्याचा प्रयत्न केला. 'या भारतात बंधूभाव नित्य वसू दे। दे वरचि असा दे। हे सर्व पंथ-संप्रदाय एक दिसू दे। मतभेद नसू दे? हे विद्यापीठ गीत प्रत्येक विद्यापीठीय कार्यक्रमात आणि महाविद्यालयीन कार्यक्रमात सन्मानाने गायले जावे, यावर आपला कटाक्ष असायचा, कारण या गीताचे शब्द तरुण पिढीवर संस्कार करतील, याची आपणास शाश्वती होती. विद्यापीठाच्या शताब्दी वर्षात आपल्या इच्छेवरून 'राष्ट्रसंतांचे जीवनदर्शन' आणि 'राष्ट्रसंतांची जनजागृती चळवळ' अनेक मान्यवरांच्या मार्गदर्शनात हे दोन ग्रंथ प्रकाशित केल्या गेले. आपल्या डोक्यात अनेक योजना होत्या. त्या कार्यान्वित करण्याचा आपला मानस होता. विद्यापीठीय राजकारण आणि जवळजवळ चारशे महाविद्यालयाचा परिवार सांभाळतांना अनेक कष्ट आपणास सोसावे लागले. 'ज्याचे अंगी मोठे पण तया यातना कठीण' याचा प्रत्यय आपल्या कार्यकाळात आम्हाला दिसला. आपल्या कुलगुरू पदाच्या पुनर्नियुक्तीच्या समारंभात मी शुभेच्छा देताना म्हणालो होतो. 'विद्यापीठीय जबाबदारीचा काटेरी मुकुट सांभाळतांना तुमची होणारी दमछाक सर कुठली ताकद तुम्हाला बळ देते.' आपण फक्त स्मित हास्य केले. आपल्या कष्टात कुटुंबसुद्धा दुःखी होते, असे मी म्हणालो. तुम्ही मला मोलाचा संदेश दिला, 'सत्याचा लढा लढतांना मानसिक, शारीरिक, आर्थिक त्रास होतो. कुटुंबाला त्रास भोगावे लागते, पण मी सत्याच्या बाजूने उभा आहे. लाचार न बनता संघर्ष करतो आहे हे आत्मिक समाधान मला मिळत आहे. माझ्या परिवारासमोर मी आदर्श ठेवत आहे.' 'सर तुमचे शब्द आजही मस्तिष्कात घुमत आहे'. काही दिवसाआधी आपली प्रकृती ठीक नसल्याची बातमी वाचली, पण ती प्रकृती आम्हाला धोका देऊन आमच्यातून आपणास हिसकावेल असा साधा संशय आला नाही. 'आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चाले ना' राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मृत्यू विषयीचे एक गीत आठवले, त्यातल्या काही ओळींमधून तुम्हाला अश्रुपूर्ण नयनाने, हुंदक्यांना समजावत भावपूर्ण आदरांजली वाहतो-

**विधाता मृत्यु हो ऐसी। हजारो लोग रोते हो।**
**सफल हो जिन्दगी सचकी। कीर्ती घर-घर में गाते हो।।**
**राज्यसत्ता हिले सारी। कदर करने को मृत्यु की।**
**अरे! यह क्या हुआँ ऐसा। आखों में निर लाते हो।।**
**ओ तुकड्यादास कहता है। भाग्य है ऐसे मरने का।**
**अमर हो नाम भारत मे। शत्रु झुककर सर नमाते हो।।**

## वाचक विचार मंच

# गांधीजींच्या जयंतीपुरती स्वच्छता नको!

स्वच्छ भारत हा विषय तसा कधीही न संपणारा असला तर शासनाकडून कित्येक कोटी रुपये यावर खर्च होतो आहे. मात्र, चित्र फारसे बदललेले दिसत नाही. आजही ग्रामीण भागातील अनेक गावागावात घाणीचे साम्राज्य पाहावयास मिळते. अनेकांच्या घरात अनुदानित शौचालय असूनही याचा वापर होत नसल्याचे चित्र आहे. आजही जवळपास ५०टक्के नागरिक उघड्यावर शौचालयास बसतात. जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समिती व स्थानिक ग्राम प्रशासनाकडून ना कुठली कारवाई, ना कुठली स्वच्छता जनजागृती होत आहे, यामुळे उघड्यावर शौचालयास बसण्याचे चित्र कायम आहे. आज बोटावर मोजण्याइतकेच गावे हगणदरीमुक्त झालेली दिसतात. यामध्ये आनंदवन, पाटोदा, हिवरेबाजार, वकाना या गावांचा स्वच्छतेविषयी ठसा देशभरात उमटलेला आहे. खरं तर गावविकासासाठी लोकसहभागाबरोबरच गावचे मंत्रालयही गावच्या हितासाठी सक्रिय असायला हवे. आज चौदाव्या वित्त आयोग योजनेतील कामे कागदोपत्री दिसते आहे. अनेक गावागावात अद्यापही कचराकुंडी दिसत नाही. अनेक गावात शासनाकडून हजारो रुपये खर्च करून कचरागाडी घेतली गेली मात्र याचा वापर फक्त अमावस्या व पोर्णिमेलाच होताना दिसतो आहे. गांधी जयंतीपुरते जर स्वच्छता अभियान मोहीम राबवून फोटोपुरते मर्यादित पाहावयास मिळते आहे. हे चित्र थांबवण्याची गरज निर्माण झाली असून झोपलेले गुड मॉर्निंग पथक संपूर्ण राज्यभर पुन्हा कार्यान्वित करण्याची नितांत गरज आहे.



**सचिन जगन नागरे**
किनगाव जटू, ता.लोणार, जि.बुलढाणा
मो. नं.९६०४३२१४३२

## धमाल

### बदलाचे वारे

'साहेबां'चे कट्टर वैरी
त्यांचे यार होऊ लागले
'तुतारी' वाजवायला
तयार होऊ लागले

पूर्वीपेक्षाही आता लख्ख
झाले 'शरदा'चे चांदणे
'सिल्हरओक'च्या सावलीत
आवडू लागले नांदणे

आनंदाच्या झुल्यावर
ते सर्व झुलत आहेत
'रेशीमबागे'तील 'कमळ'
'गोविंदबागे'त फुलत आहेत

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

# 'एन्काऊंटर म्हणजे दि एंड की...?'


कायद्यांतील तरतुदींचा चुकीचा किंवा गैरअर्थ लावल्याने संशयित; परंतु मुख्य आरोपी निर्धास्तपणे हिंडता फिरताना दिसत असतात, काही दिवसांनी त्याच्यावरील संशय हटविले जाऊन ते समाजात मोकळेपणाने वावरतांना दिसतात. मात्र, ज्यांना कुणाचेच पाठबळ नाही त्यांच्यावरील आरोप ना हटविले जातात, ना त्यांच्या चौकशी प्रकरणाकडे दुर्लक्ष करून त्यांची प्रकरणे दाबण्याचे प्रयत्न केले जातात. असे आरोपी तुरुंगवास आणि वेगवेगळ्या चौकशांना तोंड देत आपल्या चुकांच्या शिक्षा भोगत पुढील जीवन कंठत राहतात हे वास्तव बनले आहे.'

बदलापूर येथील नामांकित शाळेतील दोन मुलींवर अत्याचार करणारा अक्षय शिंदे हा पोलिसांशी झालेल्या एन्काऊंटरमध्ये ठार झाल्याची जुजबी माहिती पोलिसांनी दिली. आरोपीचे हात बांधलेले असताना त्याने पोलिसांची बंदूक हिसकावून घेत पोलिसांवर तीन गोळ्या कशा काय झाडल्या असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. अत्याचारीत मुलींच्या पालकांनी शाळा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाकडे तक्रारी नोंदविल्यानंतर पोलिसांकडून तातडीने कारवाई करण्यात आली नाही. शाळेचे संचालक अजूनही फरार आहेत. या प्रकरणातील गुन्हेगाराचा पोलिसांच्या ताब्यात असताना चकमक होऊन मृत्यू कसा झाला याची कायदेशीर चौकशी केली जावी, अशा लोकांच्या भावना आहेत. आजपर्यंत मुली, स्त्रिया यांच्यावर अत्याचार केले जातात त्यानंतर त्यांची हत्या केली जाते त्यावरून लोकांच्या भावना प्रक्षुब्ध होतात, प्रचंड जनआक्रोश होतो हे सन २०१२ च्या निर्भया हत्याकांड प्रकरणानंतर दिसून आले आहे. सन २०१९ मध्ये हैदराबाद येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयातील महिला डॉक्टरचा सामूहिक बलात्कार करून खून करण्यात आला. यावर्षी कोलकाता येथील शासकीय रुग्णालयात प्रशिक्षण घेणाऱ्या महिला डॉक्टरचा बलात्कार करून खून करण्यात आला तेव्हाही झालेल्या जनआक्रोशाला सामोरे जाणे प्रशासक व पोलिसांना कठीण झाले होते. हैदराबाद येथील डॉक्टरच्या खून प्रकरणातील चार आरोपींचा पळून जाण्याच्या प्रयत्नात पोलिसांनी केलेल्या एन्काऊंटरमध्ये मृत्यू झाला. त्याच्या तपासात आरोपींनी पोलिसांकडून शस्त्रे हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला हा पोलिसांचा दावा अविश्वसनीय ठरला होता. एन्काऊंटरमध्ये मृत्यू पावलेल्या अक्षय शिंदेच्या आईने पोलिसांवर गंभीर आरोप करीत चौकशी करण्याची मागणी केली आहे. कायद्यांतील तरतुदींचा चुकीचा किंवा गैरअर्थ लावल्याने संशयित; परंतु मुख्य आरोपी निर्धास्तपणे हिंडता फिरताना दिसत असतात, काही दिवसांनी त्याच्यावरील संशय हटविले जाऊन ते समाजात मोकळेपणाने वावरतांना दिसतात. मात्र, ज्यांना कुणाचेच पाठबळ नाही त्यांच्यावरील आरोप ना हटविले जातात, ना त्यांच्या चौकशी प्रकरणाकडे दुर्लक्ष करून त्यांची प्रकरणे दाबण्याचे प्रयत्न केले जातात. असे आरोपी तुरुंगवास आणि वेगवेगळ्या चौकशांना तोंड देत आपल्या चुकांच्या शिक्षा भोगत पुढील जीवन कंठत राहतात हे वास्तव बनले आहे.'

**स्नेहा राज**
गोरेगाव, मुंबई.
मो.नं.९९६७०१५८९९

## गुल्लेर

# द्या वर्गनी




**नरेंद्र इंगळे**

9561226572


'वर्गनी द्या भाऊ..'

'आता कायची वर्गनी करून राह्यले? आगुदर गनपतीची वर्गनी देली. काल दुर्गादेवीची पावती फाडली.'

'खप्तीबाबाचं मंदीर बांधून राह्यलो आम्ही.'

'हे कुठून काढले खप्तीबाबा?'

'हे स्वयंभू होते.'

'स्वयंभू म्हनजे?'

'म्हनजे त्याहिचा जन्म मायच्या पोटातून झाला नाही. शंभर वर्षाआगुदर आपोआप पृथ्वीवर प्रगट झाले.'

'भलतीच सांगू नको.. आजलोक कोनी बगर मायबापाचा पैदा झाला काय? काही फुसाळ्या तानता लेकहो?'

'पोथीत लिहेल आहे तसं.'

'तो पोथी लिहिनारा खप्तीच होता. बिनामायचं लेकरु होत नसते. कोन्या गावचा होता बाबा?'

'हा माह्या सासरवाडीचा होता. एक दिवस माह्या सपनात आला.. मले म्हने तुह्या गावात आपलं देऊळ बांध.'

'अरे काय सारे देवळंच बांधता? काहून खप्तीपना करता? त्या गनेसले सपनात बेढर सरप दिसला. त्यानं सुपिनाथाचं देऊळ बांधलं. सकाय सपनात इचू दिसला त इचवाचं देऊळ बांधसान काय?'

'तसं नाही.. माही श्रद्धा आहे खप्तीबाबावर.'

'मंग तुह्या आंगनात बांध.. एकटाच पैसे लाव.. आमाले कायले तरास देऊन राह्यला?'

'चौकात देऊळ चांगलं दिसते.'

'आजकाल काही लोकाईचे धंदे होऊन बसले. वर्गनीतून देऊळ बांधतात. त्याच्याभोवती दुकानं काढून भाड्यानं देतात. काय करीना केला या बाबानं?'

'बाबाचे लय चमत्कार आहेत.. बाबानं बाईची चिमनी केली.. मानसाचं कबुतर केलं.'

'तूच भरोसा ठेव अशा गोष्टीवर!'

'देऊळ झालं की दनदन लागते.. भंडारे होतात. भागोत होतात.'

'काय सांगते त्या भागोतात'?

मेल्यावर काही संगं येत नाही. पाप्याले नरकात अन् पुन्यवानाले स्वर्गात जा लागते. तेवढं सांगासाठी भागोत्या पन्नास हजार घेते. किती वर्षापासून एकच गोष्ट आयकून राह्यले तरी डोकशात फरक पडला नाही.. बस करा आता भंडारे!'

# वक्फ बोर्ड विधेयकावर १.२५ कोटी प्रतिक्रिया

## खासदार दुबे यांचे जेपीसी अध्यक्ष पाल यांना निवेदन

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** वक्फ बोर्ड विधेयकावर एक कोटीहून अधिक प्रतिक्रिया प्राप्त झाल्या आहेत. भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी याबाबत चिंता व्यक्त केली आहे. पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तचर संघटनेसह चीनसारखे देश व झाकीर नाईकसारख्या प्रवृत्तींचा यामागे हात असल्याचे जाणवते, असेही दुबे यांनी बोलून दाखवले आहे. संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक विभागाचे मंत्री किरेन रिजिजू यांनी ८ ऑगस्ट रोजी लोकसभेत वक्फ विधेयक २०२४ सादर केले होते.




काँग्रेस, समाजवादी पक्षासह विरोधी पक्षांनी या विधेयकाला मुस्लीमविरोधी ठरवले होते. लोकसभेत त्यावर चर्चा होऊ शकली नव्हती. मग, संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) ते पाठवण्यात आले. समितीने विधेयकात सुधारणा करण्यासाठी जनतेकडून प्रतिक्रिया मागवल्या होत्या.

# देशातील अन्नधान्य उत्पादनात विक्रमी वाढ

## एकूण अन्नधान्य उत्पादन ३३२२.९८ लाख टन

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई :** देशामध्ये २०२३-२४ या वर्षात एकूण अन्नधान्य उत्पादन ३३२२.९८ लाख टन झाल्याचा अंदाज असल्याचे केंद्रीय कृषी मंत्रालयाने नुकतेच जाहीर केले. २०२२-२३ मध्ये झालेल्या ३२९६.८७ लाख टन अन्नधान्य उत्पादन झाले होते. त्यापेक्षा हे प्रमाण २६.११ लाख टन अधिक आहे. तांदूळ, गहू आणि धान्याच्या चांगल्या उत्पादनामुळे अन्नधान्य उत्पादनात विक्रमी वाढ झाली असल्याचे मंत्रालयाने सांगितले.

कृषी मंत्रालयाने सांगितले की, २०२३-२४ या वर्षात तांदळाचे उत्पादन १३७८.२५ लाख टन झाले. गेल्या वर्षीच्या १३५७.५५ लाख टन तांदूळ उत्पादनापेक्षा हे प्रमाण २०.७० लाख टन अधिक आहे. तर यंदा गव्हाचे उत्पादन ११३२.९२ लाख टन झाल्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या ११०५.५४ लाख टन गव्हाच्या उत्पादनापेक्षा हे २७.३८ लाख टन अधिक आहे. कृषी मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, यंदा महाराष्ट्रासह दक्षिणेकडील राज्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती राहिली.

# सिंगापूरमध्ये भारतीय वंशाच्या ४ जणांवर गुन्हा दाखल

## पोलिसांशी गैरवर्तन केल्याचा आरोप

वृत्तसंस्था

**सिंगापूर :** सिंगापूरमध्ये एका पोलीस अधिकाऱ्यासोबत उपद्रव आणि गैरवर्तन केल्याप्रकरणी भारतीय वंशाच्या चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'चॅनल न्यूज एशिया'च्या बातमीनुसार, फेसबुकवर दोन मिनिटांचा एक व्हिडिओ पोस्ट करण्यात आला आहे ज्यामध्ये चार आरोपी पोलीस अधिकाऱ्यासोबत अपशब्द वापरताना दिसत आहेत.

बातमीनुसार, मोहम्मद दिनो मार्सियानो अब्दुल वहाब (४४), ॲलेक्स कुमार ज्ञानसेकरन (३७), मोहम्मद युसूफ मोहम्मद याहिया (३२)



आणि मोहनन व्ही बालकृष्णन (३२) या चार आरोपींची 'लिटिल इंडिया'मधील कथित हत्येप्रकरणी चौकशी करण्यात आली. रविवारी सकाळी घटनास्थळी पोहोचलेल्या पोलीस अधिकाऱ्याशी गैरवर्तन केले.

# श्रीहरिकोटा इस्रो: मिशन शुक्रयानाची तयारी सुरू

## २०२८मध्ये होणार प्रक्षेपण

देशोन्नती वृत्तसंकलन

**श्रीहरिकोटा :** भारताची पहिली शुक्र मोहीम मार्च २०२८ मध्ये प्रक्षेपित होणार आहे. केंद्र सरकारने १९ सप्टेंबर रोजी या मिशनला मान्यता दिली. हे मिशन चार वर्षे चालणार आहे. शुक्र ग्रह पृथ्वीपासून सुमारे ४ कोटी किमी दूर आहे. शुक्राला पृथ्वीचा जुळा ग्रह असेही म्हणतात. तथापि, येथे दिवस आणि रात्र पृथ्वीपेक्षा जास्त लांब आहेत. शुक्र आपल्या अक्षावर अतिशय संथ गतीने फिरत असल्यामुळे शुक्रावरील एक दिवस पृथ्वीच्या २४३ दिवसांच्या समान आहे.

भारताचे हे मिशन शुक्राच्या कक्षेचा अभ्यास करणार आहे. ग्रहाचा पृष्ठभाग, वातावरण, आयनोस्फीअर (वातावरणाचा बाह्य भाग) बद्दल माहिती गोळा करेल. शुक्र सूर्याच्या जवळ आहे (सुमारे ११ कोटी किलोमीटर). अशा स्थितीत सूर्याचा त्यावर काय परिणाम होतो? हेही कळेल. शुक्र ग्रह आकार आणि घनतेच्या बाबतीत पृथ्वीसारखाच आहे. त्यामुळे शुक्राचा अभ्यास केल्यास पृथ्वीची उत्क्रांती आणि इतर गोष्टी समजण्यास मदत होऊ शकते.

# राहुल गांधींच्या नागरिकत्वावर उच्च न्यायालयाचा केंद्र सरकारला सवाल

देशोन्नती वृत्तसंकलन

**अलाहाबाद :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाच्या वादावर अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने केंद्र सरकारकडून तपशील मागवला आहे. न्यायालयाने विचारले की नागरिकत्व कायदा १९५५ अंतर्गत दाखल केलेल्या निवेदनावर कोणताही निर्णय घेतला आहे का ज्यामध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर ब्रिटिश नागरिकत्व असल्याच्या आरोपांची चौकशी करण्याची विनंती करण्यात आली आहे.

लखनौ खंडपीठात न्यायमूर्ती राजन रॉय आणि न्यायमूर्ती ओम प्रकाश शुक्ला यांच्या खंडपीठात या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे.



राहुल गांधी यांच्या नागरिकत्वावर प्रश्न उपस्थित करत कर्नाटक भाजपचे कार्यकर्ते एस विघ्नेश शिशिर यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. ज्यावर न्यायालयाने सुनावणीदरम्यान केंद्र सरकारला प्रश्न विचारला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० सप्टेंबर रोजी होणार आहे. पीआयएलमध्ये याचिकाकर्त्याने दावा केला आहे की राहुल गांधी ब्रिटिश नागरिक असल्याच्या मुद्यावर त्यांनी सविस्तर चौकशी केली आहे आणि अनेक नवीन माहिती मिळाली आहे.

# जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीच्या मैदानात योगी आदित्यनाथ यांची एन्ट्री

देशोन्नती वृत्तसंकलन

**जम्मू :** जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुका आता अंतिम टप्प्यात आल्या आहेत. तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात विधानसभेच्या ४० जागांवर मतदान होणार आहे. ज्यामध्ये जम्मूमध्ये २६ आणि काश्मीरमध्ये १४ जागा आहेत, मात्र खरी लढत जम्मूच्या हिंदू पट्ट्यातील जागांवर होणार आहे. भारतीय जनता पक्षाचे (भाजप) फायरब्रँड नेते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ निवडणूक प्रचाराच्या या टप्प्यात प्रवेश करत आहेत.

निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात योगी आदित्यनाथ यांच्या प्रवेशामागे हिंदू पट्ट्यातील लढा असल्याचे बोलले जात आहे. योगी आदित्यनाथ आज २६ सप्टेंबर रोजी खेल मैदान मध, गुडवाल मैदान रामगढ आणि बाना सिंह स्टेडियमवर रॅलींना संबोधित केले.



योगी आदित्यनाथ यांच्या २७ सप्टेंबरला दोन निवडणूक रॅलीही होणार आहेत. गृहमंत्री अमित शाह आणि माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या निवडणूक रॅलीही होणार आहेत. गृहमंत्री अमित शाह जम्मूमध्ये पाच सभांना संबोधित करणार आहेत. अमित शाह यांच्या उधमपूरमध्ये दोन, कठुआमध्ये दोन आणि जम्मू जिल्ह्यात एक सभा होणार आहे. त्याचवेळी स्मृती इराणींच्या दोन निवडणूक रॅली नियोजित आहेत.



## मेक इन इंडिया मोहीम ठरली यशस्वी : राजनाथसिंह

# भारताकडून ९० देशांना शस्त्रास्त्र निर्यात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** भारताचे संरक्षण उत्पादन २०२३-२४ या आर्थिक वर्षात १.२७ लाख कोटी रुपयांच्या सर्वोच्च स्तरावर पोहोचले आहे. आता भारत ९० हून अधिक मित्रदेशांना शस्त्रास्त्रे अन् सैन्य उपकरणांची निर्यात करत आहे. भारतीय सशस्त्रदल आता भारतात निर्मित शस्त्रास्त्रांचा वापर करत आहेत आणि देश जागतिक संरक्षण औद्योगिक पटलावर वेगाने उदयास येत आहे असे उद्गार संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काढले आहेत. मेक इन इंडिया कार्यक्रमाला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी ही माहिती दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने देशाला प्रत्येक क्षेत्रात आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टिकोनातून मेक इन इंडिया कार्यक्रम सुरू केला होता. तेव्हापासून १० वर्षांनी संरक्षण क्षेत्रासमवेत प्रत्येक क्षेत्रात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. मागील काही वर्षांमध्ये सरकारने देशांतर्गत संरक्षण उद्योगाला चालना देण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत.


### २१ हजार कोटीची निर्यात

भारताची संरक्षण निर्यात २०२३-२४ मध्ये पहिल्यांदाच २१ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक राहिली आहे. संरक्षण मंत्रालयाने पुढील ५ वर्षांमध्ये हा आकडा वाढून ५० हजार कोटी रुपये करण्याचे लक्ष्य बाळगले आहे. भारत जागतिक स्तरावर शस्त्रास्त्रांच्या मोठ्या आयातदारांपैकी एक आहे. भारतीय सशस्त्र दलांकडून २०२९ पर्यंत भांडवली खरेदीत सुमारे १३० अब्ज डॉलर्स खर्च होण्याचा अनुमान आहे. केंद्र सरकार आयात शस्त्रास्त्रांवरील निर्भरता कमी करू पाहत आहे. याचमुळे देशांतर्गत संरक्षण उद्योगाला चालना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# विनवणीनंतर अखेर पाकिस्तानला आईएमएफकडून मिळाले कर्ज

वृत्तसंस्था

**इस्लामाबाद :** कर्जबाजारी पाकिस्तानला वारंवार विनंती केल्यानंतर अखेर आईएमएफकडून कर्ज मिळाले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्यकारी मंडळाने बुधवारी रोखीने अडचणीत असलेल्या पाकिस्तानसाठी ७ अब्ज डॉलर्सचे नवीन कर्ज मंजूर केले. दोन्ही बाजूंनी दोन महिन्यांपूर्वी सांगितले होते की त्यांच्यात एक करार झाला आहे. पाकिस्तानला हे कर्ज ३७ महिन्यांत हप्त्यांमध्ये मिळणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पाकिस्तानची ढासळलेली अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आणण्यासाठी मदत करणे हा या कर्जाचा उद्देश आहे.



पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी एका निवेदनात या कराराचे स्वागत केले आहे. ज्यासाठी त्यांचा संघ जूनपासून आईएमएफ सोबत वाटाघाटी करत होता. त्यांनी मंजुरी दिल्याबद्दल आईएमएफ प्रमुख क्रिस्टालिना जॉर्जिव्हा आणि त्यांच्या टिमचे आभार मानले. जागतिक कर्जदाता आईएमएफने सांगितले की ते या कर्जापैकी सुमारे ?१ अब्ज त्वरित जारी करेल.

# बांगलादेश लष्करात इस्लामीकरण सुरू

देशोन्नती वृत्तसंकलन

**ढाका :** बांगलादेशात इस्लामीकरण तीव्र झाले आहे. सरकार तर सोडा, आता बांगलादेशच्या लष्करानेही कट्टरतावाद्यांसमोर शरणागती पत्करलेली दिसते. बांगलादेश लष्कराने महिला सैनिकांना हिजाब घालण्याची परवानगी देण्याची ही पहिलीच वेळ आहे. २००० साली बांगलादेश लष्करात महिलांचा समावेश करण्यात आला होता, तेव्हापासून लष्करात हिजाब घालण्यास मनाई होती. कट्टरवाद्यांच्या दबावाखाली बांगलादेश लष्कराने आता आपले नियम बदलले आहेत.

बांगलादेशी मीडिया रिपोर्टनुसार, जर महिला सैनिकांना हिजाब घालायचा असेल तर त्या आता तो घालू शकतात. याबाबतचा आदेश

### महिला सैनिक हिजाबमध्ये दिसणार



महाअधिवक्ता कार्यालयाकडून जारी करण्यात आला आहे. त्यानंतर आता महिला लष्करी कर्मचाऱ्यांसाठी हिजाब घालणे ऐच्छिक करण्यात आले आहे. बीडीन्यूज २४ ने वृत्त दिले आहे की बांगलादेशमध्ये महिला अधिकारी, नर्सिंग कर्मचारी आणि इतर लष्करी कर्मचाऱ्यांवर हिजाब घालण्यावरील बंदी आता उठवण्यात आली आहे. ॲडज्युटंट जनरलच्या कार्यालयाने जारी केलेल्या आदेशात असे म्हटले आहे की, ३ सप्टेंबर रोजी झालेल्या पीएसओ परिषदेत एक तत्वतः निर्णय घेण्यात आला होता, ज्यामध्ये इच्छुक महिला कर्मचाऱ्यांना गणवेशासह हिजाब घालण्याची परवानगी देण्यात आली होती. २००० साली बांगलादेश लष्करात महिलांचा समावेश करण्यात आला होता, त्यानंतर आतापर्यंत महिलांना गणवेशासह हिजाब घालण्याची परवानगी नव्हती. ॲडज्युटंट ऑफिसने आता वेगवेगळ्या गणवेशांसोबत (कॉम्बॅट युनिफॉर्म, वर्किंग युनिफॉर्म आणि साडी) हिजाबचे नमुनेही द्यावेत असे निर्देश दिले आहेत. हिजाबच्या नमुन्यात फॅब्रिक, रंग आणि आकारदेखील समाविष्ट केला आहे. प्रस्तावित हिजाब परिधान केलेल्या महिला लष्करी जवानांची रंगीत छायाचित्रे २६ सप्टेंबरपर्यंत संबंधित विभागाला पाठवण्यास सांगण्यात आले आहे.

# हिमाचल प्रदेश उत्तर प्रदेशच्या पावलांवर पाऊल

**शिमला :** खाद्यपेय गृहांसंबंधांमध्ये आता उत्तर प्रदेश पाठोपाठ हिमाचल प्रदेशातही कठोर नियम लागू करण्यात आल्याची माहिती राज्य सरकारने दिली आहे. पारदर्शित्व, सार्वजनिक सुरक्षा आणि वैद्यकीय सुरक्षा लक्षात घेऊन खाद्यपेयगृहांसाठी राज्य सरकारने महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. ती बुधवारपासून क्रियान्वित करण्यात आली आहेत. त्यामुळे हिमाचल प्रदेशच्या खाद्यपेयगृहांनाही आपल्या विक्री केंद्रांच्या दर्शनी भागावर स्पष्ट दिसेल अशाप्रकारे मालक, व्यवस्थापक, भागीदार, चालक आणि संबंधितांची नावे आणि माहिती प्रदर्शित करावी लागणार आहेत.

# बांगलादेशाने हिलसा माशावरील निर्यातबंदी उठवली

## पश्चिम बंगालमध्ये २४२० टन हिलसा मासे

देशोन्नती वृत्तसंकलन

**ढाका :** बांगलादेशाने पुन्हा एखदा भारतासोबतची फिश डिप्लोमसी पुनर्स्थापित केली आहे. नवरात्रीच्या निमित्ताने बांगलादेशातून भारतात २४२० टन हिलसा मासे पाठवले जाणार आहेत. खास चवीमुळे या माशांना पश्चिम बंगालमध्ये मोठी मागणी असते. या माशांच्या निर्यातीवर बांगलादेशाने घातलेली बंदी आता उठवण्यात आली आहे.

नवरात्रीच्या काळात बांगलादेशातून हे मासे पश्चिम बंगालमध्ये पाठवले जाण्याची प्रथा गेली काही वर्षं सुरू आहे. याला हिल्सा फिश डिप्लोमसी असे नाव दिले गेले होते, आणि तत्कालीन पंतप्रधान शेख हसिना यांनी भारतासाठी या माशाच्या निर्यातीवरील बंदी उठवली होती. हसिना यांनी तत्कालीन मुख्यमंत्री ज्योती बसू आणि आताच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना हे मासे भेट म्हणून पाठवले होते. २०२३मध्ये बांगलादेशाने ३९५० टन मासे भारतात पाठवले होते, पण शेख हसिना पदावरून पायउतार झाल्यानंतर बांगलादेशाने हा माशांच्या निर्यातीवर बंदी घातली. स्थानिक मागणी पूर्ण करण्यासाठी ही बंदी घातल्याचे सरकारचे मत होते, पण आता बांगलादेशाने निर्यातबंदीचा हा निर्णय मागे घेतला आहे.



**नवी मुंबई :** मुंबईसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला आहे. मुंबईत टॅक्सीवाले भायखळापर्यंत जाण्यासाठी मीटर बंद करून २०० रु. तर दादर स्टेशनपर्यंत ६०० रु. भाडे आकारित आहे.

# तेहरिक-ए-इन्साफ पक्षाच्या 350 नेत्यांवर दहशतवादाचे गुन्हे

## इम्रान खानचा पक्ष अडचणीत

वृत्तसंस्था

**लाहोर :** इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ पक्षाच्या सुमारे ३५० नेत्यांवर दहशतवाद आणि इतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पंजाब पोलिसांकडून गुन्हे दाखल झालेल्या नेत्यांमध्ये खैबर पख्तुनख्वा प्रांताचे मुख्यमंत्री अली आमिन गंदापूर यांचाही समावेश आहे.

या सर्वांवर गेल्या शनिवारी लाहोरमध्ये झालेल्या सभेदरम्यान पोलिसांवर झालेल्या हल्ल्यात कथित सहभागाबद्दल दहशतवादविरोधी आणि खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या नेत्यांच्या अटकेसाठी त्यांच्या निवासस्थानांवर छापे टाकण्यास सुरुवात केली आहे.

गंदापूर यांच्यावर प्लाझाची तोडफोड, खिडक्या फोडणे आणि सीसीटीव्ही कॅमेरे फोडल्याचाही आरोप आहे. लाहोरच्या रॅलीतील फरार नेता हम्माद अझहरला पळून जाण्यास मदत केल्याप्रकरणी अन्य वरिष्ठ नेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रीलंकेच्या अध्यक्षांनी संसद केली विसर्जित

## दोन महिन्यात संसदेच्या निवडणुका होणार

वृत्तसंस्था

**कोलंबो :** श्रीलंकेचे नूतन अध्यक्ष दिसानायके यांनी संसद विसर्जित केली असून दोनच महिन्यात नव्याने संसदेच्या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. पंतप्रधानांच्या शपथविधीनंतर पहिल्याच दिवशी दिसानायके यांनी संसद विसर्जित करण्याच्या आदेशांवर स्वाक्षरी केली असून मंगळवारी मध्यरात्रीपासूनच संसद विसर्जित करण्यात आल्याचे या आदेशामध्ये म्हटले आहे. आता १४ नोव्हेंबर रोजी संसदेच्या मुदतपूर्व निवडणुका घेतल्या जाणार आहेत. अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यानच दिसानायके यांनी संसदेच्या मुदतपूर्व निवडणुका घेण्याचे सूतोवाच केले होते.

# काजू प्रक्रिया उद्योग रोजगार अनुदान योजनेत सुधारणा

**पणजी :** उद्योग, व्यापार आणि वाणिज्य संचालनालयाने 'काजू प्रक्रिया उद्योग रोजगार अनुदान योजनेत काजू प्रक्रिया उद्योगाची वाढ व्हावी यासाठी सुधारणा केली आहे. काजू प्रक्रिया उद्योगाद्वारे नियमित कामगारांना वार्षिक वेतनाच्या ५० टक्के अनुदान देत उद्योगाला चालना देण्याचा या योजनेचा उद्देश आहे. आता काजू उद्योगांमध्ये काम करणाऱ्या गोव्यातील कामगारांना सलगपणे ४ महिने काम दिल्यास उद्योगाला वेतनावर अनुदान मिळणार आहे. पूर्वी सगलपणे सहा महिने कामाची असलेली अट आता शिथिल केली जाणार आहे.

# मधमाशीचे विष कर्करोगावर अमृत

देशोन्नती वृत्तसंकलन

**सिडणी :** मधमाशी हा अतिशय घातक कीटकांपैकी एक आहे. मधमाशीचा डंख खूप वेदनादायक असतो मात्र मधमाशीच्या डंखातील विष वापरून आता कर्करोगासारखा आजार मुळापासून नष्ट करणे शक्य होणार आहे. या नव्या शोधामुळे भविष्यातील बऱ्याच गंभीर समस्या सुटणार आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ ऑस्ट्रेलिया आणि हॅरी पर्किन्सन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल

'जर्नल एनपीजे नेचर पर्सिसन ऑन्कोलॉजी'मध्ये हे संशोधन प्रकाशित करण्यात आले आहे. या संशोधनात दावा करण्यात आला आहे की मधमाशीचे विष ट्रिपल निगेटिव्ह ब्रेस्ट कॅन्सर आणि इतर ब्रेस्ट कॅन्सरच्या पेशी नष्ट करण्यास प्रभावी आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ ऑस्ट्रेलियाचे मुख्य संशोधक डॉ. सियारा डफी यांनी सांगितले की त्यांनी मधमाशीच्या विषाचे ब्रेस्ट कॅन्सरच्या पेशींवर परीक्षण केले.

### मधमाशा व भुंग्याच्या विषाचे परीक्षण

या अभ्यासासाठी ऑस्ट्रेलिया, आयरलंड आणि इंग्लंड येथील ३१२ मधमाशा आणि भुंग्याच्या विषाचे परीक्षण केले. यात असे आढळून आले की मधमाशीच्या विषामध्ये असलेले मेलिटीन ६० मिनिटांच्या आत कर्करोगाच्या पेशींचा पडदा नष्ट करू शकतो. फक्त २० मिनिटांत, मेलिटिन कर्करोगाच्या पेशींच्या वाढीसाठी आणि पेशी विभाजनासाठी आवश्यक असणारे रासायनिक घटक कमी करण्यास सक्षम होते. शास्त्रज्ञांनी सांगितले की जेव्हा स्तनाच्या कर्करोगाच्या शेवटच्या टप्प्यावर उपचार करण्यासाठी केमोथेरपी केली जात असेल तेव्हा त्यासोबत मधमाशीचे विष वापरले जाऊ शकते.

### ऑस्ट्रेलियातील तज्ज्ञांचा दावा

रिसर्चच्या वैज्ञानिकांनी केलेल्या दाव्यानुसार मधमाशीच्या डंखातील विष कर्करोगाच्या पेशी एका तासात नष्ट करू शकते.

'टीओआय'च्या एका बातमीनुसार हे संशोधन २०२० साली करण्यात आले आहे.

# बीडमध्ये होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन

## अनिल जगताप फ्रिज,टीव्ही,शिलाई मशीनसह विजेत्या महिलांना मिळणार पैठणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडच्या संस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपले सर्वोपरी योगदान देणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या संकल्पना मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला–भगिनींच्या अंगी असलेल्या कलागुणांना दर्जेदार व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ६.०० वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे अमोल जाधव यांच्या वतीने भव्य दिव्य होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्या महिलेस फ्रिज, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन महिलांना प्रत्येकी १ एलसीडी टीव्ही असे दोन एलसीडी टीव्ही, तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या तीन महिलांना प्रत्येकी १ शिलाई मशीन अशा तीन शिलाई मशीन व त्यानंतर पुढील २१ विजेत्या महिलांना प्रत्येक १ पैठणी अशा २१ पैठणी साडी बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. याबरोबरच होम मिनिस्टर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला संसार उपयोगी आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वतः महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीडमधील

पान २ वर...

### महिलांनी सहभागी व्हावे: अनिल जगताप

बीडमधील महिला–भगिनींच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता माझे सहकारी अमोल जाधव यांच्या माध्यमातून होममिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे दि. ५ ऑक्टोबर रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे सायं ६.०० वाजता भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे. फ्रिज, एलसीडी टीव्ही, शिलाई मशीन, पैठणी साडी तसेच संसार उपयोगी असणाऱ्या भेटवस्तू देखील सहभागी महिलां–भगिनींना देण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील हे स्वतः उपस्थित राहणार असून पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ते स्वतः करणार आहेत. रोजच्या दैनंदिन व्यापातून स्वतःसाठी थोडासा वेळ काढून बीड शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# बीडमध्ये मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यत!

## राजेंद्र मस्के मित्र मंडळाचे उत्कृष्ट नियोजन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आता पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर बीड मध्ये सुद्धा भव्य मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने बीड शहरा जवळील तळेगाव शिवारात२९ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ०९.०० वा मैदान सुरु होणार आहे. बहुचर्चित मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीमध्ये महाराष्ट्रातील नामांकित बैल बकासुर, सर्जा, सोन्या, हिंदकेसरी यासारख्या धडाकेबाज बैलजोड्या शर्यतीत सहभागी होणार आहेत.

हौशी शेतकरी बांधवांना पश्चिम महाराष्ट्रा प्रमाणे आपल्या जिह्यात बैलगाडा शर्यतीत सहभाग घेता यावा यासाठी राजेंद्र मस्के मित्र मंडळ यांनी गतवर्षी प्रमाणे याहीवर्षी बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले असून, बैलगाडा शर्यतीचे हे तिसरे वर्ष आहे. मागील वर्षी घोषित केल्याप्रमाणे प्रथम बक्षीस सोनालीका ट्रॅक्टर ठेवण्यात आले असून, इतर सहा रोख आकर्षित बक्षिसे विजयी स्पर्धकांना देण्यात येतील. बीडसह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या



जिल्ह्यातून शेतकरी तथा स्पर्धक संपर्क साधत असून, हजारोच्या वर शेतकरी स्पर्धेत सहभागी होतील असा अंदाज आहे. शर्यतीचे उत्कृष्ट नियोजन करण्यात येत असून, पार्किंग व्यवस्था, पिण्याचे पाणी

पान २ वर...

# अजितदादाचा विश्वास सार्थ ठरवणार

## निवड:राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्षपदी अमित खामकर



नगर /पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) ओबीसी विभागाच्या अहमदनगर शहर जिल्हाध्यक्षपदी अमित खामकर यांची फेर निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी छत्रपती संभाजी नगर येथील ओबीसी विभागाच्या विचार मंथन शिबिरात दिले. याप्रसंगी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, आमदार सतीश चव्हाण आदी उपस्थित होते.

अमित खामकर यांनी ओबीसी विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष म्हणून विविध सामाजिक, शैक्षणिक कामातून वेगळा ठसा उमटवला आहे. समाजातील गोरगरीब, गरजू तसेच अडीअडचणीच्या वेळी सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारा

पान २ वर...

### अजितदादांचा विश्वास सार्थ ठरवणार

पक्षाने जी जबाबदार दिली आहे ती मी कार्यकर्ता म्हणून पार पडेल. जिथे जिथे माझी गरज पक्षाला पडेल त्या त्यावेळी मी उपलब्ध राहील. समाजाला न्याय मिळेल असे काम करून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विश्वास सार्थ ठरवेन, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी ओबीसी सेलचे नूतन शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर यांनी दिली.

# तलवार बाळगणारा तरुण ताब्यात



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

बेकायदेशीपणे तलवार बाळगून रस्त्यावर फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळताच आष्टीच्या पोलिसांनी त्याचा शोध घेऊन अखेर त्या तरुणाला तलवारीसह बुधवारी रात्री गजाआड केले.

आष्टी शहरात एक तरूण सर्रास बेकायदेशीरपणे कमरेला आतून तलवार लावून रस्त्यावर फिरत असल्याची गोपनीय माहिती पोउपनि नामदेव धनवडे यांना मिळाली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तात्काळ मिळाल्या माहिती आधारे पोना प्रविण क्षिरसागर, अशोक शिंदे, काळे, चालक भगत यांना

पान २ वर...

# लाडक्या बहिणीच्या मदतीसाठी सरसावले

## धोरण: सुट्टीच्या दिवशीही देणार सेवा

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सरकारने गोरगरीब महिलांसाठी लाडकी बहीण योजना जाहीर केली त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी बँक खाते असणे आवश्यक आहे म्हणून बँकांमधून महिलांची खूप जास्त गर्दी वाढली. बँकांची दैनंदिन कामे आणि अचानकपणाने होणारी महिलांची गर्दी यामुळे बँकांवर प्रचंड ताण वाढला परिणामी ग्राहक आणि बँक कमर्चारी यांच्यातील ताणतणाव वाढू लागले काही ठिकाणी तर बँकेच्या कमर्चाऱ्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न झाला. कामाचा ताण अचानक वाढला परंतु बँकेचा स्टाफ हा अचानक वाढवता येत नसल्यामुळे आहे त्या स्टाफ मध्ये ग्राहकांना सेवा देण्याचे काम सुरू होते परंतु कितीही प्रयत्न केले तरी दिलेल्या वेळेमध्ये ते काम पूर्ण होणे शक्य नव्हते म्हणून



–खइए– आणि –खइज– शी संलग्न असलेल्या बँक कर्मचारी आणि अधिकारी संघटना यांनी एकत्रित येऊन बँक व्यवस्थापनास सुट्टीच्या दिवशी बँकेत जाऊन कामे करू त्यासाठी बँक व्यवस्थापनाने सहकार्य करावे , अशी विनंती केली आणि ही शिल्लक कामे करून लाडकी बहीण योजेने संदर्भातील उघडावयाचे खाते असोत किंवा आधार, रिप खात्याला जोडणे, त्याप्रमाणे बँकेच्या रेकॉर्ड वर त्याची (के वाय सी) नोंद घेणे यासाठी पुढाकार घेऊन कसल्याही प्रकारचा मोबदला न घेता सुट्टीच्या दिवशी आपापल्या शाखांमध्ये जाऊन बँक ऑफ महाराष्ट्रच्या–खइए– व –खइज– या संघटनेच्या कमर्चारी / अधिकारी यांनी काम केले .संघटनेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेबद्दल बोलताना कॉ. उत्तम होळीकर म्हणाले बँकिंग सेवा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असला पाहिजे ही बँक कर्मचारी संघटनेची मागणी आहे आणि म्हणून

पान २ वर...

# नाळवंडीत राबले आरोग्य शिबिर

## ऋणानुबंध:डॉ.योगेश क्षीरसागरांचा स्तुत्य उपक्रम



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील नाळवंडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुढाकारातून मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी (दि.२७) घेण्यात आले. शिबिरात १ हजार २६५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून गटनिहाय हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

नाळवंडी येथील प्राथमिक आश्रम शाळेत आरोग्य शिबिराचे उद्घाटन केले. दिवसभरात १ हजार २६५ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. ६८२ जणांना मोफत चष्मे वाटप केले. १३२ जणांची रक्त तपासणी, १६२ जणांची ईसीजी केली. तर १७ जणांनी रक्तदान केले. उद्घाटन प्रसंगी डॉ.क्षीरसागर दाम्पत्यासह जि.प.चे माजी सदस्य तथा सरपंच ड.राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी काँग्रेससचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, माजी पं.स.सदस्य अच्युतराव शेळके, सुधाकर काकडे, अरुण लांडे, दत्ताप्रसाद सानप, मंगलताई म्हेत्रे, संगीताताई वाघमारे, अशोक वैद्य, बबन वाघमारे, मिलींद ठोकळ, संजय काळे, शेख बिलाल, रामहरी कुटे, सुमंत राऊत, शाम राऊत यांच्यासह पंचक्रोशीतील रुग्ण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तर ऊस गाळप होऊ देणार नाही

## आक्रमक: रयत क्रांती संघटनेचा इशारा

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी मागील वर्षी दुष्काळी परिस्थिती बिकट असुन शेतकऱ्यांनी रक्ताचे पाणी करून ऊसाचे उत्पादन घेतले, परंतु यावर्षी उत्पादनात मागिल वर्षा पेक्षाही उत्पादन कमी होणार आहे त्यामुळे साखर कारखान्यानी उसाचा भाव आचारसंहितेपूर्वी जाहीर करावा, नाही तर यावर्षी उसाचे गळीत सुरू होऊ देणार नाही असा इशारा रयत क्रांती संघटनेने जिल्हाधिकारी अहमदनगर यांना देण्यात आलेल्या निवेदनात दिला आहे

नगर जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की यावर्षी केंद्र सरकारने साखर कारखान्यांना इथेनॉल निर्मितीला परवानगी दिली असल्यामुळे ४००० रुपये भाव देणे सहज शक्य आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी आचार संहिता लागण्याआधी भाव जाहीर करावा सोलापुरात जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी भाव जाहीर केला पुणे जिल्ह्यातील सोमेश्वर सहकारी साखर



कारखान्याने मागिल वर्षी गेलेल्या उसाला ३६५० रू भाव दिला आहे

नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी २७०० ते २८०० इतका कमी भाव का घ्यायचा त्यामुळे शेतकऱ्यांचा अंत पाहू नका व आमच्या घामाला दाम द्या ,आम्हाला रस्त्यावर येण्याची वेळ येऊ देऊ नकाआचारसंहितेच्या पुर्वी नगर जिल्ह्यातील ऊस दर जाहीर करा व मागील वर्षीचा दुसरा हप्ता ५००रु शेतकऱ्यांचा खात्यात वर्ग करावा अन्यथा रयत क्रांती संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे निवेदनावर तालुका अध्यक्ष सतीश पवार जगुभाऊ पवार भिकाभाऊ रेवाळे आकाश निशाने पंकज देठे सुनील पवार पांडुरंग देठे माऊली निशाने आदींच्या सह्या आहेत

# पोलीस चौकी शोभेसाठी बांधली का?

## सवाल: केज बसस्थानकात प्रवाशाचा खिसा कापला



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी


केज तालुक्यातील वरपगाव येथील शेतकरी आश्रुबा दादाराव भालेराव (वय ६५) हे १९ सप्टेंबर रोजी दुपारी केज बसस्थानकात आले. त्यांच्या खिशात सोयाबीन विकलेले रोख ४९ हजार ५०० रुपये होते. बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांचा खिसा कापला आणि सर्व पैसे लंपास केले. हा प्रकार बसमध्ये बसल्यानंतर भालेराव यांच्या लक्षात आला. त्यांनी बसमधून उतरत पुन्हा केज गाठले. त्यानंतर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. त्यावरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. केज बसस्थानकात चोरीचे प्रमाण वाढत आहे. गेल्या काही दिवसापूर्वीच तहसीलदारांच्य पत्नीचे सोने चोरीला गेले होते. अश्याच प्रकारे आठवड्यात एकदा तरी चोरी होते या कडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. केज बसस्थानकात पोलीस चौकी आहे पण तिथे कोणाचीच पोलीस डियूटी लावलेली नसल्या कारणाने ती सदा बंद असते. त्यामुळेच चोरांचे धर्य वाढत आहे. केज बसस्थानकात तात्कळ पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी असे प्रवासी मागणी करत आहेत.

## समस्या क्रांतीनगर दलीत वस्तीत दयनिय अवस्था

# केज नगर पंचायतचे दुर्लक्ष!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथील क्रांती नगर केज येथे १९८२ –१९८३ साली कानडी रोड गायरान जमिनीत राज्य सरकारने सर्व प्रथम विटा मातीचे घरे बांधून मा. तहसील कार्यालय केज यांनी लकीड्रॉ काढून एस.सी व एस.टी. बेघर नागरीक यांना पत्र देऊन वाटप केले. दुसरा टप्पा ९० घराचे बांधकाम सुरू होते. ९० घराचे बांधकाम संपल्यानंतर मा. तहसील कार्यालय यांनी दप्तर दिरंगाई करीत ९० घरे वाटप केले नाहीत. त्या मुळे त्या ९० घरात बेघर नागरिकांनी अतिक्रमण करून राहण्यास सुरुवात केली. त्या वेळी केज ग्राम पंचायत अस्तित्वात होती. ग्राम पंचायत केज यांनी अनेक ठिकाणी बोर घेऊन पिण्याचे पाणी काही प्रमानात उपलब्ध करून दिले. सांड पाणी,अंघोळी करिता



केजडी नदीवर विसबऊन राहावं लागतं असे. तर अंतर्गत रस्ते चिखल मातीचेच तो होते. केज नगर पंचायत अस्तित्वात आल्यावर क्रांती नगर भागात विकास होईल अशी प्रामाणिक प्रयत्न काही नगर सेवक यांनी केला. त्यांच्या काळातील रस्ते व नाल्या, तीन इंची पाईप लाईन आजही निदर्शनात येतात परंतु गेल्या पाच सात वर्षां पासून क्रांती नगर भाग एक बकाल वस्ती म्हणून गणला जातो. या ठिकाणी धड पिण्याच्या पाण्याचीसोय नाही. रस्ते, नाल्या, लाईट तर नावालाच आहेत. केज शहरातील क्रांतीनगर दलीत वस्ती असताना गेल्या पस्तीस चालिस वर्षां पासून फंड जातो कुठं हा संशोधनाचा विषय आहे. राजकीय पुढारी यांनी चिरीमिरी देऊन काही पिलावळे येथे हि निर्माण केलेले आहेत का असा विचार मनात येतो. या पुढे क्रांती नगर भागात रस्ते , नाल्या, स्ट्रीट लाईट, स्वतंत्र पाईप लाईन, सभाग्रह, व सर्व रहिवाशी यांना कबाली पत्र, पी. टी. आर. व रमाई घरकुल योजना, पंतप्रधान घरकुल योजना यांचा पहिला हप्ता विनाअट देण्यात यावा. नसता २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिना निमित्त सर्व क्रांती नगर येथील रहिवासी यांचे वतीने मा. तहसील कार्यालय केज येथे तीव्र निदर्शने करण्यात येईल

पान २ वर...

# परळी शहरात अवैध धंदे तेजीत

## आक्रमक : आमरण उपोषण करण्याचा दिला इशारा



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी शहरातील भीमनगर साठेनगर रमानगर उखळवेस येथील अवैध धंदे बंद करण्यात यावेत यासाठी दि २/१०/२०२४ रोजी परळी पोलीस स्टेशन समोर आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती भीमनगर दारूबंदी कृती समितीच्या वतीने देण्यात आल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकार द्वारे देण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरातील भीमनगर साठेनगर रमानगर उखळवेस येथील अवैध धंदे बंद करण्यात यावेत यासाठी परळी पोलीस स्टेशन व इतरांना अनेक वेळा लेखी निवेदने देऊन हि व

पान २ वर...